पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २८४ ■ गुरूवार, दि. २३ एप्रिल २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# बंगालच्या कुमारगंजमध्ये भाजप उमेदवारावर हल्ला...!



वृत्तसंस्था २३ एप्रिल

**नवी दिल्ली:** पश्चिम बंगालमधील दक्षिण मिदनापूर येथील कुमारगंज मतदारसंघातील भाजपचे उमेदवार सुवेंदू सरकार यांच्यावर हल्ला झाला. हल्ल्यातून वाचण्यासाठी सुवेंदू पळताना व्हिडिओमध्ये दिसत आहेत. त्यांचा सुरक्षा रक्षक त्यांच्यासोबत आहे. असे असूनही, जमाव त्यांना मारहाण करतच राहतो.

हल्ला करणाऱ्यांची ओळख अद्याप निश्चित झालेली नाही. मिळालेल्या वृत्तानुसार, निवडणूक आयोगाने व्हिडिओमध्ये दिसलेल्या सर्वांना तात्काळ अटक करण्याचे आदेश दिले आहेत. दरम्यान, राज्यभरातील अनेक ठिकाणी भाजप आणि टीएमसी कार्यकर्त्यांमध्ये संघर्ष झाल्याचे वृत्त आहे. अनेक ठिकाणी ईव्हीएममध्ये बिघाड झाल्याच्या तक्रारीही आल्या आहेत.

पश्चिम बंगालमधील निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील १५२ जागांसाठी आणि तामिळनाडूतील सर्व २३४ जागांसाठी मतदान सुरू आहे. दुपारी १ वाजेपर्यंत बंगालमध्ये ६२.१८% आणि तामिळनाडूमध्ये ५६.८१% मतदान झाले आहे. बुधवारी रात्री उशिरा मतदानापूर्वी मुर्शिदाबादच्या नौदा येथे क्रूड बॉम्ब फेकला गेला. यात अनेक जण जखमी झाले. यानंतर, आम जनता उन्नयन पार्टीचे (एजेयूपी) प्रमुख हुमायून कबीर सकाळी घटनास्थळी पोहोचले, तेव्हा त्यांना विरोधाचा सामना करावा लागला. त्यांचा टीएमसी कार्यकर्त्यांशी संघर्षही झाला. त्यानंतर त्यांनी धरणे आंदोलन केले. त्यांनी सांगितले की, पोलिस टीएमसी कार्यकर्त्यांविरुद्ध गुंडगिरी करत आहेत आणि त्यांच्या समर्थकांना मारहाण केली जात आहे. सिलीगुडीमध्ये मतदानादरम्यान भाजप आणि टीएमसी कार्यकर्त्यांमध्ये संघर्षही झाला.

### कुमारगंजमध्ये भाजप उमेदवारावर हल्ला

दक्षिण दिनाजपूरमधील कुमारगंज विधानसभा मतदारसंघातील भाजप उमेदवार शुभेंदू सरकार यांच्यावर तृणमूल काँग्रेसच्या समर्थकांनी हल्ला केल्याचा आरोप आहे. एका बूथवर 'बूथ जॅमिंग' होत असल्याची माहिती मिळाल्यावर सरकार तिथे पोहोचले असता, त्यांना लाठ्या-काठ्यांनी आणि बुक्क्यांनी मारहाण करण्यात आली. पोलिसांनी मूकदर्शक बनून हा प्रकार पाहिल्याचा गंभीर आरोप शुभेंदू सरकार यांनी केला आहे.

### हुमायून कबीर यांच्या गाडीवर दगडफेक

मुर्शिदाबादमध्ये हिंसाचाराचे तांडव सुरूच असून रेजीनगर येथीलउमेदवार हुमायून कबीर यांच्या ताफ्यावर जमावाने हल्ला केला. आंदोलकांनी त्यांच्या कारला घेरून लाठ्या-काठ्यांनी आणि विटांनी हल्ला केला, ज्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

### सिलीगुडीत भाजप-TMC आमनेसामने

सिलीगुडीतील जगदीश चंद्र विद्यापीठ येथील मतदान केंद्राबाहेर भाजप आणि ऊश्ण कार्यकर्त्यांमध्ये जोरदार राडा झाला. यावेळी भाजप उमेदवार शंकर घोष घटनास्थळी उपस्थित होते. वाद वाढत गेल्याने दोन्ही बाजूंनी धक्काबुक्की सुरू झाली, मात्र केंद्रीय सुरक्षा दलाच्या (CAPF) जवानांनी तात्काळ हस्तक्षेप करत जमावाला पांगवले आणि मोठी दुर्घटना टळली.

# अकोला महापालिकेत विकासकामांना वेग...!

- रस्त्यांची दुरुस्ती व नव्या रस्त्यांचे बांधकाम
- नियमित व सुरळीत पाणीपुरवठा व्यवस्था




प्रतिनिधी २३ एप्रिल

**अकोला:** अकोला शहराच्या विकासाला आता खऱ्या अर्थाने गती मिळण्याचे संकेत मिळत आहेत. भारतीय जनता पक्षाच्या पुढाकारातून आणि महापालिका प्रशासनाच्या सक्रिय भूमिकेमुळे शहरातील प्रलंबित विकासकामांना वेग देण्याचा निर्धार करण्यात आला आहे. स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांनी माध्यमांशी संवाद साधताना स्पष्टपणे सांगितले की, 'अकोला शहरातील मूलभूत सुविधा सक्षम करणे हेच आमचे प्राथमिक उद्दिष्ट आहे.'

### रस्ते, पाणी व स्वच्छतेवर विशेष लक्ष

शहरातील खराब रस्ते, अपुरा पाणीपुरवठा आणि स्वच्छतेच्या समस्या नागरिकांसाठी मोठा डोकेदुखीचा विषय ठरल्या होत्या. या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासनाने या तिन्ही प्रमुख क्षेत्रांवर लक्ष केंद्रित केले आहे.

### नागरिकांच्या सहभागालाही महत्त्व

शहराच्या सर्वांगीण विकासासाठी केवळ प्रशासन नव्हे, तर नागरिकांचाही सहभाग तितकाच महत्त्वाचा असल्याचे अग्रवाल यांनी अधोरेखित केले. 'प्रशासन आणि नागरिक यांच्यातील समन्वयामुळेच अकोला अधिक सक्षम आणि विकसित होईल,' असे ते म्हणाले.

### अकोल्याच्या विकासाचा नवा अध्याय

महापालिकेच्या या निर्णयांमुळे अकोला शहरात विकासाचा नवा अध्याय सुरू होण्याची चिन्हे दिसत आहेत. दीर्घकाळ प्रलंबित असलेली कामे पूर्णत्वास गेल्यास शहराच्या पायाभूत सुविधांमध्ये मोठा बदल अपेक्षित आहे. नागरिकांच्या अपेक्षांना पूर्ण करत अकोला स्मार्ट आणि सुसज्ज शहराच्या दिशेने वाटचाल करेल, अशी आशा व्यक्त होत आहे.

### स्वच्छता मोहिमांना गती

या सर्व बाबींवर संबंधित विभागांना स्पष्ट सूचना देण्यात आल्याची माहिती अग्रवाल यांनी दिली. प्रलंबित कामांचा आढावा, निर्णय प्रक्रियेला वेग आला असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले. महापालिकेच्या विविध विभागांकडील प्रलंबित प्रकल्पांचा नियमित आढावा घेतला जात असून, निर्णय प्रक्रियेला गती देण्यात येत आहे. काही महत्त्वाचे विकास प्रस्ताव अंतिम टप्प्यात पोहोचले असून, लवकरच त्यांना मंजुरी मिळणार असल्याचेही त्यांनी सांगितले. 'या कामांना मंजुरी मिळाल्यानंतर शहराच्या विकासाला नवे पंख मिळतील,' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# दर्यापूरच्या युवकाचा कार अपघातात मृत्यू

प्रतिनिधी २३ एप्रिल

**दर्यापूर :** येथील गोविंद मेडिकलचे संचालक अमोल अशोकराव तराळ (४२) यांचा अमरावती दर्यापूर मार्गावरील खारतळेगाव नजीक कार अपघातात जागीच मृत्यू झाला. ही घटना काल रात्री साडेअकरा ते बाराच्या दरम्यान घडल्याची माहिती आहे.




कार वरील नियंत्रण सुटून झाडाला जबर धडक दिल्याने अपघात झाला. यामध्ये कारचा पूर्णपणेचें दामेंदा झाला असून नागरिकांच्या मदतीने अमोल यांना अमरावती येथे नेले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. अमरावती इरविन रुग्णालयाच्या शिवविच्छेदन केंद्रात त्यांचे शेवाविच्छेदन करण्यात आले. शांत संयमी स्वभावाचे असलेले अमोल तराळ यांचा अचानक मृत्यू झाल्याने दर्यापूर शहरात शोककळा पसरली आहे.

# होर्मुझमधील सुरुंग काढायला लागणार सहा महिने

वृत्तसंस्था २३ एप्रिल

**नवी दिल्ली:** मागील काही महिन्यांपासून इराण आणि अमेरिकेमध्ये तणाव युद्ध सुरू आहे. या युद्धामुळे स्ट्रेट ऑफ होर्मुझ बंद आहे. हे युद्ध थांबवण्यासाठी अनेक देशांन प्रयत्न सुरू केले आहेत. पण, या दोन्ही देशात कायमस्वरूपी युद्धविराम झाला तरी, लगेचच परिस्थिती सामान्य होईल असे नाही. स्ट्रेट ऑफ होर्मुझ पुन्हा काही महिने बंदच राहू शकतो. याबाबत अमेरिकेच्या लष्कराने मोठा खुलासा केला आहे, होर्मुझमध्ये



पेरलेले भूसुरुंग हटवण्यासाठी अंदाजे सहा महिने लागू शकतात, असे पेंटागॉनने उघड केले आहे. यामुळे जागतिक ऊर्जा पुरवठा आणि किमतींवर लक्षणीय परिणाम होण्याची शक्यता आहे.

होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणारी सामान्य वाहतूक लगेचच पूर्ववत होणार नाही. इराणी सैन्याने पेरलेले भूसुरुंग हटवण्यासाठी अंदाजे सहा महिने लागू शकतात, असे पेंटागॉनने अमेरिकी खासदारांना कळवले आहे. २८ फेब्रुवारी रोजी युद्ध सुरू झाल्यापासून या महत्त्वाच्या सागरी मार्गावरील वाहतूक प्रभावित झाली आहे. अमेरिकन वृत्तपत्र 'द वॉशिंग्टन पोस्ट'नुसार, पेंटागॉनने खासदारांसाठी आयोजित केलेल्या एका गोपनीय बैठकीत हे मूल्यांकन सादर केले. बोगदे हटवण्यासाठी बराच वेळ लागेल, त्यामुळे नजीकच्या भविष्यात ऊर्जेच्या किमती कमी होण्याची शक्यता कमी आहे. अमेरिकेतील मध्यावधी निवडणुका संपेपर्यंत पेट्रोल आणि तेलाच्या किमती वाढलेल्या राहू शकतात.

# अशोक खरातच्या पत्नीने फिरवला गेम, सगळे आरोप नवऱ्यावर ढकलले



प्रतिनिधी २३ एप्रिल

**नाशिक:** नाशिकचा भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात दररोज नवनवीन खुलासे समोर येत आहेत. लैंगिक अत्याचारासह अनेकांची फसवणूक करणारा भोंदू अशोक खरात दिवसेंदिवस अडचणीत सापडत आहे. आता या प्रकरणात मोठा ट्विस्ट आला आहे.

अशोक खरातची पत्नी कल्पना खरातने या प्रकरणात आपला कसलाही सहभाग नसल्याचं सांगत या प्रकरणापासून अंतर राखलं आहे. एवढंच नव्हे तर आपल्या पतीने अनेक गंभीर गुन्हे केले, अशी कबुली देखील कल्पना खरातने कोर्टात दिल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे आता अशोक खरातच्या अडचणीत आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

खरं तर, अशोक खरातला अटक झाल्यानंतर ३१ मार्चपासून कल्पना खरात फरार आहे. नाशिक पोलीस तिचा सर्वत्र शोध घेत आहेत. मात्र तिचा कुठेच थांगपत्ता लागत नव्हता. दरम्यान, कल्पना खरातकडून अटकपूर्व जामिनासाठी राहाता न्यायालयात अर्ज दाखल केला होता. या अर्जावर आज सुनावणी पार पडली. कल्पना खरातच्या बाजुने कोर्टात वकील प्रशांत गिरी उपस्थित होते. त्यांनी कल्पना खरातची भूमिका मांडताना सर्व आरोप फेटाळून लावले.

पती अशोक खरातच्या गुन्ह्यांबाबत मला माहीत नाही. माझ्या पतीने गंभीर गुन्हे केलेत, अशी कल्पना खरातची भूमिका असल्याचं वकिलांनी कोर्टात संगितलं.

# स्टेथोस्कोप सोडले, डॉ. हुसेन यांनी हातात घेतला छन्नी-हातोडा !

## अकोला महापालिकेत डॉ. जिशान हुसेन यांचा 'सर्जिकल स्ट्राईक'

प्रतिनिधी २३ एप्रिल

**अकोला:** मृदू स्वभावाचे आणि रुग्णांची नाडी ओळखणारे एम.डी. मेडिसिन तज्ज्ञ जेव्हा हातात छन्नी-हातोडा घेऊन महापालिकेत थडकतात, तेव्हा प्रशासन हादरल्याशिवाय राहत नाही. अकोला महानगरपालिकेत आज असाच काहीसा थरार पाहायला मिळाला. निमित्त होते विरोधी पक्षनेते पदाच्या दालनाचे, पण यामागे होता सत्ताधाऱ्यांच्या मनमानी कारभाराविरुद्धचा प्रचंड असंतोष. अकोला महानगरपालिकेत काँग्रेसचे नगरसेवक डॉ. जिशान हुसेन यांची विरोधी पक्षनेतेपदी निवड होऊनही त्यांना अधिकृत चेंबर उपलब्ध करून दिले जात नव्हते. वारंवार मागणी करूनही सत्ताधारी आणि प्रशासनाने याकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले. अखेर आज संयमाचा बांध फुटला.




महापौर आणि स्थायी समिती सभापतींची पत्रकार परिषद संपते न संपते तोच महापालिकेत मोठा 'राडा' सुरू झाला. नेहमी पांढऱ्या कोटात दिसणारे डॉ. जिशान हुसेन आज एका वेगळ्याच अवतारात दिसले. सोबत काँग्रेसचे सर्व नगरसेवक आणि आक्रमक कार्यकर्त्यांची फौज होती. सत्ताधाऱ्यांनी विरोधी पक्षाची अडवणूक केल्याचा आरोप करत डॉ. हुसेन यांनी स्वतः हातात छन्नी-हातोडा घेतला आणि थेट दालनाचे कुलूप तोडले. 'जर लोकशाही मार्गाने हक्क मिळत नसेल, तर तो हिसकावून घ्यावा लागतो,' असा संदेशच जणू या आक्रमक कृतीतून त्यांनी दिला.

# नागरिकांनो दुपारी 12 ते 4 अतिमहत्वाच्या कामाशिवाय बाहेर पडणे टाळा

प्रतिनिधी २३ एप्रिल

**मुंबई:** राज्यातील हवामानात मोठा बदल होताना दिसत आहे. सध्या राज्यावर दुहेरी संकट आहे. उष्णतेसह अवकाळी पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा या भागात आजही पावसाचा इशारा देण्यात आला.

गेल्या दोन ते तीन दिवसांपासून या भागात पाऊस सुरू आहे. ज्यामुळे पिकांची वाट



लागली असून शेतकरी राजा चिंतेत आहे. त्यामध्येच आजही पावसाचा येलो अलर्ट हवामान विभागाने जाहीर केला. कोकणासह अन्य भागात आज उष्णता वाढण्याचा अंदाज आहे. बुधवारी अनेक जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस झाला. मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी या जिल्ह्यांमध्ये उष्णता वाढणार आहे. नागरिकांनी दुपारी १२ ते ४ घराबाहेर अतिमहत्वाचे काम असल्याशिवाय पडू नये. सोलापूर, सांगली, सातारा, सिंधुदुर्ग, पुणे, धाराशिव, कोल्हापूर, लातूर, नांदेड या भागात विजांच्या कडकडाटासह पाऊस होण्याचा अंदाज आहे. आजपासून पुढील ४ दिवस दक्षिण मध्य महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाड्यातील काही जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह गारपीट होण्याची शक्यता. आजपासून पुढील ४ दिवस दक्षिण विदर्भ, मराठवाडा मध्य महाराष्ट्र, पावसाचा येलो अलर्ट जारी. वादळी पाऊस होणार असल्याचा पुणे हवामान विभागाचा अंदाज आहे. सांगली, सोलापूर, सातारा, धाराशिव, लातूर, परभणी, बीड, चंद्रपूर ,यवतमाळमधील नागरिकांना सतर्कतेचा इशारा जारी.

हवामानातील बदलाचा फटका आरोग्यावरही दिसत आहे. करमाळा तालुक्यात वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली. करमाळा शहरासह ग्रामीण भागात वादळी वाऱ्यासह पावसाची जोरदार बॅटिंग. करमाळा तालुक्यातील ग्रामीण भागातील कंदर, सातोली गावासह काही भागात गारांचा पाऊस झाला. यामुळे शेती पिकांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने दिलेल्या इशाऱ्यानुसार नाशिक जिल्ह्याच्या उत्तर पूर्व भागाला अवकाळी पाऊस व गारपीटीने चांगले झोडपले.

# बारामतीत सकाळी ११ वाजेपर्यंत २०.५९ टक्के मतदान


प्रतिनिधी २३ एप्रिल

**पुणे :** बारामती विधानसभा पोटनिवडणुकीसाठी आज मतदान प्रक्रिया पार पडत आहे. सकाळी सात ते नऊ या दोन तासात ८.०१ टक्का इतके मतदान झाले आहे. या निवडणुकीसाठी ३ लाख ८४ ,हजार ५७९ मतदार आहेत. तर दुसऱ्या टप्प्यात सकाळी ११ वाजेपर्यंत २०.५९ टक्के मतदान झाले आहे. उन्हाची तीव्रता असल्याने दुसऱ्या टप्प्यात अनेक नागरिक मतदानासाठी बाहेर आल्याचे दिसून आले आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघासाठी आज, गुरुवारी (दि. २३) मतदान होत असून, या निवडणुकीत महायुतीच्या उमेदवार म्हणून सुनेत्रा पवार रिंगणात उतरल्या आहेत. त्यांच्यासह एकूण २३ उमेदवार निवडणूक लढवत असले तरी प्रमुख विरोधी पक्षाचा दमदार उमेदवार नसल्याने ही निवडणूक एकतर्फी होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. दरम्यान, बारामती विधानसभा मतदारसंघात एकूण ३ लाख ८४ हजार ५७९ मतदार असून, त्यामध्ये १ लाख ९० हजार ६८४ महिला, १ लाख ९३ हजार ८७१ पुरुष आणि २४ तृतीयपंथी मतदारांचा समावेश आहे.

CMYK CMYK

# वाचन संस्कृतीचा दीपस्तंभ : जागतिक पुस्तक दिन




२३ एप्रिल हा दिवस संपूर्ण जगभर जागतिक पुस्तक दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. हा दिवस केवळ पुस्तकांचा गौरव करण्यापुरता मर्यादित नसून तो ज्ञान, विचार, संस्कृती आणि सर्जनशीलतेच्या जतनाचा व प्रसाराचा उत्सव आहे. मानवी सभ्यतेच्या इतिहासात पुस्तकांनी जे योगदान दिले आहे, ते अनमोल आहे. शब्दांच्या माध्यमातून माणसाने आपल्या अनुभवांना, विचारांना, ज्ञानाला आणि संस्कृतीला आकार दिला आणि ते पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवले. त्यामुळे पुस्तक हे केवळ अक्षरांचा संच नसून ते मानवी उत्क्रांतीचे आणि सामाजिक प्रगतीचे सशक्त साधन आहे. 'जागतिक पुस्तक दिन' हा आपल्याला या महत्त्वाची जाणीव करून देणारा आणि वाचनसंस्कृतीला नवसंजीवनी देणारा एक प्रेरणादायी दिवस आहे.

मानवाच्या आरंभीच्या काळात ज्ञानाची देवाणघेवाण तोंडी परंपरेतून होत असे. कथा, लोकपरंपरा, धार्मिक विधी आणि जीवनातील अनुभव यांद्वारे ज्ञान पिढ्यान?पिढ्या पुढे जात होते. परंतु लिपीचा शोध लागल्यानंतर ज्ञानाचे लिखित स्वरूपात जतन होऊ लागले आणि तेच पुढे पुस्तकांच्या स्वरूपात विकसित झाले. भारतीय संस्कृतीमध्ये वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत, बौद्ध त्रिपिटक, जैन आगम, संत साहित्य आणि विविध तत्त्वज्ञानपर ग्रंथांनी ज्ञानपरंपरेचा भक्कम पाया घातला. या ग्रंथांमध्ये केवळ धार्मिक किंवा तात्त्विक विचार नाहीत, तर मानवी जीवनाचे तत्त्वज्ञान, नैतिक मूल्ये, सामाजिक संरचना आणि जीवनपद्धती यांचा सखोल अभ्यास आढळतो. त्यामुळे पुस्तक हे केवळ ज्ञानाचे साधन नसून ते जीवनाला दिशा देणारे मार्गदर्शक ठरते.

वाचन ही एक सवय नसून ती एक संस्कारप्रक्रिया आहे. वाचनामुळे व्यक्तीच्या विचारशक्तीला चालना मिळते, कल्पनाशक्ती विस्तारते आणि विवेकबुद्धी विकसित होते. एखादे पुस्तक वाचताना वाचक त्या लेखकाच्या अनुभवविश्वात प्रवेश करतो आणि विविध भावविश्वांचा अनुभव घेतो. त्यामुळे वाचन ही केवळ माहिती मिळवण्याची प्रक्रिया नसून ती आत्मविकासाची एक सर्जनशील यात्रा आहे. वाचनामुळे व्यक्ती अधिक संवेदनशील, विचारशील आणि समंजस बनते. समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी अशा विचारशील व्यक्तींची आवश्यकता असते.

आजच्या तंत्रज्ञानप्रधान युगात माहितीचा स्फोट झाला आहे. मोबाईल, इंटरनेट, सामाजिक माध्यमे यांमुळे माहिती सहज उपलब्ध झाली आहे. परंतु या माहितीच्या महासागरात सखोल ज्ञान हरवण्याची शक्यता निर्माण झाली आहे. माहिती ही तात्पुरती आणि तुकड्यांमध्ये मिळणारी असते, तर ज्ञान हे सुसंगत, सखोल आणि टिकाऊ असते. पुस्तक वाचनामुळेच हे सखोल ज्ञान आत्मसात करता येते. त्यामुळे तंत्रज्ञानाचा वापर करत असतानाही पुस्तक वाचनाची सवय जोपासणे अत्यंत आवश्यक आहे. डिजिटल माध्यमे ही पूरक साधने असू शकतात, परंतु त्यांची जागा पुस्तक घेऊ शकत नाही.

विद्यार्थी जीवनात वाचनाचे महत्त्व अत्यंत मोठे आहे. पाठ्यपुस्तकांपुरते शिक्षण मर्यादित ठेवणे योग्य नाही. विविध विषयांवरील संदर्भग्रंथ, चरित्रे, विज्ञान, इतिहास, साहित्य, समाजशास्त्र, अर्थशास्त्र अशा विविध क्षेत्रांतील पुस्तके वाचल्यास विद्यार्थ्यांची ज्ञानाची व्याप्ती वाढते. वाचनामुळे भाषिक कौशल्ये विकसित होतात, शब्दसंपदा वाढते आणि विचार मांडण्याची क्षमता सुधारते. स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी वाचन अत्यावश्यक आहे. त्यामुळे शालेय आणि महाविद्यालयीन स्तरावर वाचनसंस्कृती रुजवणे अत्यंत गरजेचे आहे.

समाजाच्या दृष्टीने पाहिले, तर वाचनसंस्कृती असलेला समाज अधिक प्रगत आणि जागरूक असतो. वाचनामुळे नागरिकांमध्ये सामाजिक, राजकीय आणि आर्थिक प्रश्नांविषयी जाणीव निर्माण होते. पुस्तकांच्या माध्यमातूनच अनेक सामाजिक चळवळींना बळ मिळाले आहे. समाजसुधारकांनी आपल्या लेखनातून समाजातील अन्याय, विषमता आणि अज्ञानाविरुद्ध आवाज उठवला. त्यांच्या विचारांनी समाजाला नवी दिशा दिली. त्यामुळे वाचनसंस्कृती ही लोकशाहीच्या बळकटीसाठी अत्यंत आवश्यक आहे.

मराठी साहित्य परंपरा अत्यंत समृद्ध आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, साने गुरुजी, पु. ल. देशपांडे यांसारख्या महान लेखकांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून समाजाला जागृत केले. त्यांच्या लेखनातून सामाजिक प्रश्नांवर प्रकाश टाकला गेला आणि परिवर्तनाची प्रेरणा दिली गेली. साहित्य हे समाजाचे आरसे आहे, असे म्हटले जाते आणि ते खरेही आहे.

आजच्या काळात वाचनसंस्कृतीसमोर अनेक आव्हाने उभी आहेत. तंत्रज्ञानाचा अतिरेकी वापर, वेळेअभावी वाचनाकडे दुर्लक्ष, पुस्तकांच्या वाढत्या किंमती, तसेच ग्रंथालयांची अपुरी संख्या ही काही प्रमुख कारणे आहेत. विशेषतः लहान मुलांमध्ये वाचनाची सवय कमी होत चालल्याचे दिसते. त्यामुळे बालपणापासूनच वाचनाची आवड निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे. पालकांनी मुलांना पुस्तकांची ओळख करून द्यावी आणि त्यांच्यासोबत वाचनाचा आनंद घ्यावा.

ग्रंथालये ही वाचनसंस्कृतीची केंद्रे आहेत. ग्रामीण भागात ग्रंथालयांची संख्या वाढवणे आणि त्यांना आधुनिक सुविधा उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे. शाळा, महाविद्यालये आणि सार्वजनिक ठिकाणी वाचनालये उभारून वाचनसंस्कृतीला चालना देता येऊ शकते. तसेच, पुस्तक प्रदर्शन, वाचन स्पर्धा, लेखक-वाचक संवाद, कथाकथन कार्यक्रम यांसारख्या उपक्रमांद्वारे वाचनाची आवड वाढवता येते.

'जागतिक पुस्तक दिन' साजरा करण्यामागील उद्देश म्हणजे वाचनसंस्कृतीला चालना देणे आणि लेखकांच्या योगदानाचा गौरव करणे हा आहे. या दिवशी विविध ठिकाणी पुस्तक प्रदर्शन, साहित्यिक कार्यक्रम, चर्चासत्रे आणि व्याख्याने आयोजित केली जातात. यामुळे लोकांमध्ये पुस्तकांविषयी जागरूकता निर्माण होते.

तंत्रज्ञानाच्या युगात ई-पुस्तके आणि ऑडिओ पुस्तके यांचा वापर वाढत आहे. ही साधने वाचनासाठी उपयुक्त ठरत असली, तरी पारंपरिक पुस्तकांचे महत्त्व अजूनही कायम आहे. पुस्तक हातात घेऊन वाचण्याचा अनुभव वेगळाच असतो. त्यामुळे तंत्रज्ञानाचा स्वीकार करतानाही पारंपरिक वाचनसंस्कृती जपणे आवश्यक आहे.

वाचनसंस्कृतीच्या पुनरुज्जीवनासाठी समाजातील सर्व घटकांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे गरजेचे आहे. कुटुंब, शाळा, महाविद्यालये, ग्रंथालये आणि शासन यांनी वाचनाला प्रोत्साहन देण्यासाठी विविध उपक्रम राबवावेत. 'दर महिन्याला एक पुस्तक' अशी संकल्पना राबवता येईल.

शेवटी असे म्हणता येईल की, पुस्तक हे मानवाच्या प्रगतीचे खरे साधन आहे. ज्ञान, संस्कार आणि विचार यांचे संगम म्हणजे पुस्तक. 'जागतिक पुस्तक दिन' हा आपल्याला वाचनाची प्रेरणा देणारा दिवस आहे. आजच्या युगात सखोल ज्ञान प्राप्त करण्यासाठी वाचन अत्यावश्यक आहे. त्यामुळे प्रत्येकाने वाचनाची सवय जोपासून ज्ञानसमृद्ध समाजाच्या निर्मितीत आपला वाटा उचलावा, हीच या दिवसाची खरी शिकवण आहे.

डॉ. राजेंद्र बगाटे
ईमेल : bagate.rajendra5@gmail.com

# मेळघाट हाट : दुर्गम भागातील महिलांच्या उत्पादनांना मिळाले हक्काचे व्यासपीठ

## स्वतंत्र गोदाम, पॅकेजिंग आणि लेबलिंग युनिटची व्यवस्था



अमरावती जिल्ह्यातील मेळघाट क्षेत्रातील दुर्गम भागात राहणाऱ्या स्वयंसहाय्यता महिला बचतगटांच्या श्रमाला आणि त्यांच्या कौशल्यातून साकारलेल्या उत्पादनांना 'मेळघाट हाट' विक्री केंद्राच्या माध्यमातून हक्काचे व्यासपीठ प्राप्त झाले आहे. महिलांच्या आर्थिक आणि सामाजिक सशक्तीकरणासाठी राबविण्यात आलेल्या अशा अभिनव उपक्रमांना सर्व स्तरावरून प्रोत्साहन मिळत आहे. जिल्हा वार्षिक योजनेतून जिल्हा परिषद, महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने अमरावती येथे सायन्सकोर प्रांगणालगत आधुनिक महिला बचत गट उत्पादन विक्री केंद्र सुरु आहे. हे विक्री केंद्र ५ जानेवारी २०२५ पासून नागरिकांच्या सेवेत आहे.

मेळघाट हाटच्या माध्यमातून आदिवासी क्षेत्रातील उत्पादित साहित्याला प्रथमच शहराच्या मध्यवस्तीत हक्काचे विक्री केंद्र मिळाले आहे. या मॉलच्या माध्यमातून उत्पादित वस्तूंची थेट ग्राहकांना विक्री होत असल्याने मध्यस्थांची साखळी मोडीत निघत असून बचत गटातील महिलांच्या उत्पन्नात विशेष वाढ होत आहे. या ठिकाणी ग्राहकांसाठी मेळघाटातील वैविध्यपूर्ण वनौषधी, बांबूपासून बनविलेल्या कलाकुसरीच्या वस्तू, रानमेवा आणि शुद्ध मध यासारख्या दुर्मिळ वस्तूंची मोठी श्रेणी खरेदीसाठी उपलब्ध आहे. आदिवासी महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी महिला बचत गटांना सातत्याने प्रोत्साहन देऊन आदिवासी क्षेत्रात जास्तीत-जास्त बचत गटांचे जाळे निर्माण करणे हे प्रशासनाचे मुख्य उद्दिष्ट आहे. महिलांची कला-कौशल्याला योग्य दिशा मिळावी तसेच ग्राहकांच्या मागणीनुसार उत्पादनात वैविध्य आणून त्यांना मोठी बाजारपेठ मिळवून देण्यासाठी मेळघाट हाटची निर्मिती करण्यात आली आहे.

विक्रीसाठी आणलेल्या साहित्यांना राष्ट्रीय स्तरावर योग्य भाव मिळण्यासाठी विक्री साहित्याचे उत्तम मार्केटिंग, आकर्षक पॅकिंग व प्रभावी ब्रँडिंग करणे ही काळाची गरज आहे. हीच बाब लक्षात घेऊन महिला बचत गटांना या तांत्रिक बाबींचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. या उत्पादित मालाला राज्यासह संपूर्ण देशात बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनामार्फत विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. मेळघाटातील धारणी तसेच चिखलदरा तालुक्यातील स्वयंसहाय्यता महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या मालाला कायमस्वरूपी बाजारपेठ मिळावी, याच हेतूने हे मेळघाट हाट विक्री केंद्र सुरू करण्यात आले आहे. या केंद्राचे वैशिष्ट्य म्हणजे येथे एकाच छताखाली मेळघाटातील ४७ प्रकारच्या विविध वस्तू विक्रीसाठी उपलब्ध आहेत. प्रथम टप्प्यात एकूण ६० स्वयंसहाय्यता महिला बचत गटांच्या उत्पादनांचा यात समावेश करण्यात आला होता. त्यामध्ये प्रामुख्याने बांबूपासून निर्मित विविध उत्पादने, तृणधान्यांमध्ये सावा, कुटकी, ज्वारी, बाजरी तसेच कडधान्य, गहू, लाल तांदूळ, तूर दाळ, विविध प्रकारची लोणची, चिखलदऱ्याची जगप्रसिद्ध कॉफी, मध आणि शुद्ध तूप यांचा समावेश आहे. याशिवाय गृहशोभेच्या वस्तू आणि आरोग्याच्या दृष्टीकोनातून पौष्टिक खाद्यान्ने देखील येथे उपलब्ध आहेत. या केंद्राला आधुनिक मॉलचे स्वरूप देण्यात आले असून, येथे स्वतंत्र गोदाम, पॅकेजिंग आणि लेबलिंग युनिटची व्यवस्था करण्यात आली आहे, ज्यामुळे ग्राहकांना खरेदीचा एक वेगळा अनुभव मिळत आहे.

खादी व ग्रामोद्योग मंडळ आणि महिला आर्थिक विकास महामंडळाच्या वतीने स्वातंत्र्यदिनानिमित्त मेळघाट हाट येथे 'खादी महोत्सवा'चेही आयोजन करण्यात आले होते. यावेळी कस्तुरबा सोलर खादी महिला समिती अंतर्गत धारणी तालुक्यातील महिलांनी कापसापासून सूत आणि सुतापासून कापड ते गारमेंटपर्यंतच्या उत्पादनांची निर्मिती करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या क्लस्टरतर्फे महिलांनी उत्पादीत केलेला माल खादी महोत्सवात विक्रीसाठी ठेवण्यात आला होता. विकेंद्रित सोलर चरखा समूहाच्या कार्यक्रमांतर्गत लाभार्थी महिलांनी तयार केलेली दर्जेदार खादी आणि सौर खादी उत्पादने येथे सवलतीच्या दरात नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आली होती, ज्याला अमरावतीकरांचा चांगला प्रतिसाद मिळाला. प्रशासनाच्या या अभिनव उपक्रमामुळे मेळघाटातील आदिवासी महिला भगिनींच्या बचत गटांना विक्री आणि विपणनासाठी एक सक्षम प्लॅटफॉर्म मिळाला असून, यामुळे महिला सक्षमीकरणासह आदिवासी क्षेत्रातील आर्थिक विकासाला निश्चितच मोठी गती मिळणार आहे.

अपर्णा यावलकर
माहिती अधिकारी अमरावती

# कस्तुरीचा 'आत्मजागर' ३ मे रोजी जिल्ह्यातील २० निराधार व गरजू महिलांना शिलाई मशिनचे वाटप

**अकोला :** संपूर्ण विश्वात दि. १ मे हा दिवस ' जागतिक कामगार दिन ' म्हणून साजरा केला जातो. जगभरातील सर्व कामगारांच्या कर्तृत्वाचा उत्सव या निमित्ताने होत असतो.. प्रत्येक कामगाराला त्याच्या कल्याणाचे हक्क आणि संधी याबद्दल जाणिव करून देण्याचा हा दिवस...याच दिवशी 'महाराष्ट्र' राज्याची निर्मिती देखील झाली त्यामुळे हा दिवस 'महाराष्ट्र दिन ' म्हणून सुद्धा साजरा करतात..

... या शुभदिनाचे औचित्य साधून कस्तुरीने कामगारांप्रती आपली संवेदना व्यक्त करण्यासाठी रविवार दि. ३ मे रोजी ' आत्मजागर' या उपक्रमाचे आयोजन केले आहे... या उपक्रमांतर्गत समाजातील २० निराधार व गरजू कामगार महिलांना स्वयंसिद्ध करण्यासाठी उषा कंपनीच्या शिलाई मशीनचे वाटप करण्यात येणार आहे.. यात आत्महत्या , आकस्मिक आजार व इतर कारणांमुळे मृत्यू पावलेल्या कामगारांच्या पत्नी , परित्यक्ता व काही गरजू महिला कामगारांचा समावेश आहे... या संदर्भात संपूर्ण जिल्ह्यात कावसा ,धारेल ,सिंदखेड,


कानशिवणी, म्हैसपूर, घुसर, गांधीग्राम, कपिलेश्वर , कानडी, उगवा, बोरगाव मंजु, अन्वी मिर्झापूर व शहरातील विविध भागात प्रत्यक्ष सर्वेक्षण करून गरजू महिलांची निवड करण्यात आली आहे...

रविवार दि. ३ मे २०२६ रोजी डाबकी गायगाव मार्गावरील ' कस्तुरी' परिसरात सकाळी १० वाजताआयोजित या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान शहरातील ख्यातनाम डॉ.हेडगेवार रुग्णालय व अनुसंधान केंद्र चे अध्यक्ष मा. श्री .नरेंद्र उपाख्य बाबासाहेब पाठक भूषवणार असून अकोल्याच्या जिल्हाधिकारी मा. वर्षा मीना मॅडम , शासकीय वैद्यकीय महाविद्यालय , गोंदिया चे अधिष्ठाता डॉ. कुसुमाकर घोरपडे, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण मा. श्री मारुती वाठ , जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी सौ. राजश्री कौलखेडे, माजी आमदार श्री वसंतराव खोटरे , विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज चे अध्यक्ष मा. श्री निकेश गुप्ता , स्थानिक ज्योती शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा.श्री भाऊसाहेब जानोळकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत...

... कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी एका आयोजन समितीचे गठन करण्यात आले असून या समितीत प्रा. किशोर बुटोले, संजय ठाकरे, संजय गायकवाड, अनिल पालवे, राजेश्वर पेठकर, घनश्याम चांडक,अमर शर्मा, संजय बुटोले, गोविंदसिंह गहिलोत, सुरेशचंद्र जगताप , दीपक झाडे, नरेंद्र देवघरे , पार्थ राठोड, राम भिरड , प्रा. अनिल मुळे , प्रा. जगन्नाथ बर्डे , वैभव कातखेडे , रवींद्र वानखडे , श्रीमती अनिता इधोळ , सौ. संगिता जोध, शारदा चौबे, चेतना आनंदानी, सौ. अपर्णा काळे,ज्योती सुलताने , सौ . मीरा वानखडे यांचा समावेश आहे. असे कस्तुरीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. किशोर बुटोले यांनी एका परिपत्रकांमुळे कळविले आहे.

# व्यक्ती विशेष

## विल्यम शेक्सपियर




### आज जयंती

२३ एप्रिल हा जागतिक पुस्तक आणि कॉपीराइट दिन म्हणून साजरा केला जातो, ज्याचा उद्देश वाचन, प्रकाशन आणि कॉपीराइटला प्रोत्साहन देणे आहे. हा दिवस विल्यम शेक्सपियर यांची पुण्यतिथी असल्याने साहित्य विश्वात अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. या दिवशी यू ट्यूबवर पहिला व्हिडिओ अपलोड झाला होता आणि पंडिता रमाबाईंची जयंतीही साजरी केली जाते.

२३ एप्रिलच्या प्रमुख घटना मध्ये जागतिक पुस्तक आणि कॉपीराइट दिन (World Booked and Copyright Dayed): युनेस्को (UNESCO) द्वारे पुस्तक वाचनाला चालना देण्यासाठी हा दिवस पाळला जातो.

इंग्रजी आणि स्पॅनिश भाषा दिन (Englished and Spanished Language Dayed): युएन (UN) द्वारे भाषा सांस्कृतिक विविधता साजरी करण्यासाठी।

विल्यम शेक्सपियर जयंती/स्मृती दिन: प्रसिद्ध इंग्रजी नाटककार आणि कवी विल्यम शेक्सपियर यांचा मृत्यू (१६१६) या दिवशी झाला.

पंडिता रमाबाई सरस्वती जयंती: प्रसिद्ध भारतीय समाजसुधारक आणि विदुषी यांचा जन्म (१८५८).

यूट्यूबचा पहिला व्हिडिओ: २००५ मध्ये, 'मी ट द झू' (Me at the& woo) हा पहिला भ्दल्ऊलं व्हिडिओ प्रकाशित झाला. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे जयंती: प्रसिद्ध समाजसुधारक, अस्पृश्यता निवारण कार्यासाठी ओळखले जातात (जन्म १८७३)।

सत्यजित रे स्मृती दिन: भारतीय चित्रपट दिग्दर्शक, पटकथा लेखक (मृत्यू १९९२).

# अण्णासाहेब पाटील महामंडळ ॲपमुळे लाभार्थ्यांना थेट मोबाईलवरून सेवा

**अकोला :** महामंडळाने अण्णासाहेब पाटील महामंडळ ॲप हे मोबाईल ॲप सुरू केले आहे. हे ॲप गूगल प्ले स्टोअर वर उपलब्ध असून, लाभार्थ्यांना योजनांची संपूर्ण प्रक्रिया आता थेट मोबाईलवर करता येणार आहे.तरी इच्छुकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजयसिंह देशमुख यांनी केले आहे.

महामंडळाच्या कार्यान्वित योजनांसाठी www.udyog.mahaswayam.gov.in हे संकेतस्थळ कार्यान्वित असून, महामंडळाची संपूर्ण कार्यपद्धती ऑनलाईन स्वरूपात राबविण्यात येत आहे.

योजनांच्या प्रक्रियेसाठी लाभार्थ्यांना संगणकाचा वापर करावा लागत असल्याने किंवा सायबर कॅफेचा आधार घ्यावा लागत होता. काही प्रकरणांमध्ये एजंटमार्फत फसवणुकीच्या घटना निदर्शनास आल्यामुळे लाभार्थ्यांना वेळ, खर्च आणि अनावश्यक त्रास सहन करावा लागत होता. यावर उपाय म्हणून महामंडळाने ३ सप्टेंबर २०२५ रोजी नागरी सुविधा केंद्र व आपले सरकार केंद्रांशी करार करून योजनांच्या सेवा प्रति सेवा रु. ८५ दराने उपलब्ध करून दिल्या.

लाभार्थ्यांना अधिक स्वयंपूर्ण, सुरक्षित आणि सुलभ सेवा उपलब्ध करून देण्यासाठी महामंडळामार्फत वापरकर्ता-अनुकूल मोबाईल ॲप विकसित करण्यात आले आहे. हे ॲप अण्णासाहेब पाटील महामंडळ ॲप या नावाने गूगल प्ले स्टोअर वर उपलब्ध आहे.

लाभार्थ्यांनी त्यांच्या अँड्राईड मोबाईलवर हे ॲप डाउनलोड करून वापर सुरू करावा. नवीन वापरकर्त्यांनी मोबाईल क्रमांक, नाव व ई-मेल नोंदवून ओटीपीद्वारे नोंदणी पूर्ण करावी. पूर्वी नोंदणीकृत लाभार्थ्यांनी त्यांच्या लॉगिन आयडी व पासवर्डद्वारे लॉगिन करून पुढील प्रक्रिया सुरू ठेवता येईल.

महामंडळाच्या योजनांमध्ये एलओआय, सँक्शन व क्लेम असे तीन टप्पे असून आवश्यक कागदपत्रे ॲपद्वारे अपलोड करता येतात. अर्जाची स्थिती तपासणे, अद्ययावत माहिती मिळवणे आणि पुढील कार्यवाही करणे या सर्व सुविधा ॲपमध्ये उपलब्ध आहेत. यामुळे प्रक्रिया अधिक जलद, सुलभ आणि पारदर्शक झाली असून लाभार्थ्यांचा वेळ व खर्च वाचणार आहे.



**अण्णासाहेब पाटील महामंडळाचे डिजिटल पाऊल**

सध्या क्लेम सादर करणाऱ्या व नव्याने मंजूर झालेल्या लाभार्थ्यांसाठी व्यवसायाचे जिओ-टॅग केलेले छायाचित्र अपलोड करणे अनिवार्य करण्यात आले आहे. या छायाचित्रांची पडताळणी जिल्हा समन्वयकांमार्फत केली जाईल, ज्यामुळे व्यवसाय प्रत्यक्ष सुरू असल्याची खात्री होईल आणि पारदर्शकता वाढेल.

यामध्ये जिओ-टॅगिंग व जिओ-फेन्सिंग प्रणालीचा वापर करण्यात येणार असून, गूगल नकाशाच्या सहाय्याने व्यवसाय पाहणीचे नियोजन केले जाईल. तसेच, ही माहिती महामंडळाच्या ईएचआरएमएस प्रणालीशी संलग्न करण्यात येणार असून पुढील टप्प्यात ही सुविधा मोबाईल ॲपमध्येही उपलब्ध होणार आहे. संगणक प्रणालीवरील सर्व सुविधा मोबाईल ॲपमध्ये उपलब्ध करून देण्यात आल्यामुळे लाभार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर हे ॲप डाउनलोड करून त्याचा वापर करावा व या डिजिटल उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत करण्यात आले आहे.

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर ८३९०६७०९९९ या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.

त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

सिटी न्यूज अकोला

गुरुवार, दि. २३ एप्रिल २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

# अकोला जिल्हा माहेश्वरी महिला संघटनेचा पदग्रहण सोहळा

**अकोला:** विभाग प्रा. मं. संघटना अंतर्गत अकोला जिल्हा माहेश्वरी महिला संघटनेचा पदग्रहण सोहळा व पहिली कार्यकारिणी सभा आज बुधवार दि. २२ एप्रिलला अकोट येथील सेंट पॉल पब्लिक स्कूलमध्ये आयोजित करण्यात आली आहे. यामध्ये २०२६ ते २०२९ या कालावधीसाठी अध्यक्षपदी शारदा नवनीत लखोटिया (अकोट), सचिवपदी आरती पुरुषोत्तम पनपालिया व कोषाध्यक्षपदी रेखा प्रमोद चांडक यांचा निवडण झाली आहे. या सोहळ्याला विदर्भ प्रादेशिक माहेश्वरी महिला संघटनेच्या अध्यक्षा सौ. नीलिमा मंत्री (यवतमाल), अखिल भारतीय माहेश्वरी महिला संघटना, मध्यांचलच्या संयुक्त मंत्री सौ. भारती राठी (आर्वी), विदर्भ प्रादेशिक माहेश्वरी महिला संघटनेच्या माजी अध्यक्षा तारा माहेश्वरी व ज्योती बाहेती यांसारख्या अतिथींची उपस्थिती लाभेल. अकोला जिल्ह्यातील सर्व तहसीलांच्या महिला पदाधिकारी व सदस्यांना उपस्थित राहण्याचे आवाहन अकोट तालुका माहेश्वरी महिला संघटना व अकोट माहेश्वरी महिला मंडळाकडून करण्यात आले आहे.

## अक्कलकोट रेणुका माता मंदिरात श्री परशुराम पूजन



**अकोला :** अक्षय तृतीयेच्या पावन पर्वावर, जुने शहर येथील श्री रेणुका माता मंदिरात आराध्य दैवत भगवान श्री परशुराम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त मंदिरात अभिषेक व पूजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात परिसरातील ज्येष्ठ नागरिक श्री. कांतीलालजी तिवारी यांच्या शुभहस्ते पूजन करून झाली. याप्रसंगी प्रा. मधुसूदन मारवाल, शिवलालजी भिंडा आणि महेंद्र जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती. मंदिराचे पुरोहित राम जोशी यांनी पौरोहित्य केले. यावेळी भाविकांनी सामुदायिकरीत्या परशुराम चालीसा पठण करून आरती केली. यावेळी महेंद्र जोशी म्हणाले की,ठभगवान श्री परशुराम धर्माच्या रक्षणासाठी सदैव तत्पर राहिले. आपण सर्वांनी आज असा संकल्प केला पाहिजे की, नेहमी माता-पित्यांची सेवा व त्यांच्या आज्ञेचे पालन करावे आणि कन्या तसेच महिलांचा सदैव सन्मान करावा. या सोहळ्याला किशोर डोलिया, रामकुमार शर्मा, भिकुलाल शर्मा, रमानकांत जोशी, किरण मारवाल, संजय शर्मा, पप्पू शर्मा, कमल तिवारी यांच्यासह असंख्य नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चेतन मारवाल यांनी केले.

# वंचित बहुजन आघाडीचा एल्गार, उद्या धडक मोर्चा

## सत्तारुढ पक्षाच्या विरोधात आक्रमक मोर्चाचे आयोजन

प्रतिनिधी २३ एप्रिल



**अकोला:** 'हद्दवाढ झाली, पण सुविधा अजूनही गायब!' असा संतप्त सवाल करत वंचित बहुजन आघाडीने आता प्रशासनाविरुद्ध थेट लढण्याची घोषणा केली आहे. अकोला पूर्व महानगरच्या वतीने येत्या शुक्रवार, २४ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९:३० वाजता गांधी जवाहर बाग ते महानगरपालिका दरम्यान एक भव्य आणि निर्णायक मोर्चा काढण्यात येणार आहे.

अकोला शहरात समाविष्ट झालेल्या २४ गावांच्या हद्दवाढीनंतरही नागरिकांना मूलभूत सुविधांसाठी वनवन भटकावे लागत आहे. प्रभाग क्र. ३, ४, ५, १२, १३ आणि १४ मधील पाणीप्रश्न गंभीर झाला असून, प्रशासनाच्या ढिसाळ कारभारामुळे नागरिकांमध्ये संताप उफाळून आला आहे. 'कर द्या, पण सुविधा नाहीत' हा अन्याय आता सहन केला जाणार नाही, अशी ठाम भूमिका वंचित बहुजन आघाडीने घेतली आहे. हद्दवाढीतील भागात तात्काळ पाणी नियोजन करणे. प्रभाग १४ मधील पाणीपुरवठ्यातील हलगर्जीपणा थांबवून दोषींवर कारवाई करणे.प्रभाग १४ मधील वाढीव आणि अन्यायकारक घरकर तात्काळ रद्द करून नियमबद्ध कर प्रणाली लागू करणे.पाणीपुरवठा विभागातील कामचुकार कर्मचाऱ्यांची उचलबांगडी करणे.शहरात वाढलेल्या मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त आणि डासांसाठी संपूर्ण शहरभर फवारणी करणे. झोपडपट्टीधारकांना नियमानुकूल करून त्यांना हक्काच्या घरांचा लाभ मिळवून देणे.'हा मोर्चा केवळ सुरुवात आहे. जर प्रशासनाने या मागण्यांची तात्काळ दखल घेतली नाही, तर येणाऱ्या काळात आंदोलन अधिक तीव्र केले जाईल,' असा थेट इशारा वंचित बहुजन आघाडीने दिला आहे. हा लढा केवळ पाण्यासाठी किंवा करांसाठी नसून अकोलेकरांच्या हक्कासाठी आणि अस्तित्वासाठी असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे.

# अकोट फाईल पोलिसांकडून दोन चोऱ्या उघड

प्रतिनिधी २३ एप्रिल

अकोला: ग्राम उगवा येथिल कालिंका माता मंदिरातील चांदिचे मुकुट चोरणारा आरोपी गजाआड आरोपीकडुन ६०००० रू. चा मुद्देमाल जप्त पोस्टे अकोट फाईल अकोला येथे दि. २०/०४/२०२६ रोजी फिर्यादी नामे आदित्य गणेश केने वय ३२ वर्ष रा. उगवा ताजि. अकोला यांनी रिपोर्ट दिला की, दि. ११/०४/२०२६ रोजी दुपारी ०४/०० वाजताचे दरम्यान कोण्यातरी अज्ञात चोराने त्यांचे शेतात असलेल्या कालिंका माता मंदिरातुन कार्मिका माता व गणपती यांचे मुर्तिवर ठेवलेले चांदिचे मुकुट ज्यांची अंदाजे किंमत १५००० रूपयाचे चोरून घेवुन गेला अश्या फिर्यादी यांनी दिलेल्या जबानी रिपोर्ट वरून पोस्टें ला अपराध क्रमांक ३६२/२६ कलम ३०५ (ड) बीएनएस प्रमाणे गुन्हा दाखल



करून तपासात घेतला गुन्हा दाखल झाल्यानंतर गुन्हयातील आरोपी शोध संदर्भाने मा. पोलीस अधिक्षक श्री. अर्चित चांडक साहेब, यांचे वेळोवेळी मार्गदर्शन प्राप्त करून त्यांनी दिलेल्या सुचनांचे तंतोतंत पालन करून पोनि शेख रहीम यांनी पोरटे चे गुन्हे प्रगटीकरण पथकाचे सपोउपनि अनिस खा पठाण, पोहेका प्रशांत इंगळे, योगेश काटकर, संतोष चिंचोळकर, हर्षल श्रीवास, पोकों लिलाधर खंडारे, गिरीश तिडके यांचे वेगवेगळे पथक तयार करून त्यांनी आरोपीयाचा कसोशीने शोध घेवुन आरोपी यास अटक करून गुन्हयातील चोरी गेलेला मुद्येमाल हस्तगत करण्याकरीता सुचना दिल्या वरून नमुद पथकाने तांत्रिक तसेच बौध्दिक कौशल्याचा वापर करून अकोट शहर, चोहोटा बाजार तसेच अकोट फाईल भागातील तसेच वाशिम येथिल धाबे व मुख्य रस्त्यावर लावण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमे-यांची पाहणी करून तसेच मंदिरात लावण्यात आलेल्या कॅमे-याची पाहणी करून नमुद इसमाची व तो चालवत असलेल्या मोटारसायकलची ओळख तसेच गुप्त बातमीदाराने दिलेल्या माहीतीवरून नमुद मोटार सायकल चालक व गुन्हयातील आरोपी नामे गणेश अशोक बकाल वय ३१ वर्ष रा. तिवली ता. मालेगाव जि. वाशिम यास त्याचे राहते घरून ताब्यात घेवुन त्याचे कडे गुन्हयासंबंधाने तसेच गुन्हयात मंदिरातुन चोरी केलेल्या मुकुटाबाबत विचारपुस केली असता त्याने सदर घोरी केल्याची कबुली दिली. व चोरी केलेले मुकुट हे मंदिरजवळच ठेवल्याचे सांगितले.

# अकोटमध्ये अनोळखी इसमाचा मृतदेह आढळला; ओळख पटविण्यासाठी पोलिसांचे आवाहन

वि.प्रतिनिधी २३ एप्रिल

**अकोट:** अकोट तालुक्यातील रूईखेड शिवारात एका अनोळखी इसमाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी अकोट ग्रामीण पोलीस स्टेशन येथे अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून, मृत व्यक्तीची ओळख पटविण्यासाठी पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. २१ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास रूईखेड येथील शेतकरी अमर मानकर यांच्या शेतातील धुऱ्याजवळ निंबाच्या झाडाखाली सुमारे ३० ते ३५ वयोगटातील एक अनोळखी इसम मृतावस्थेत आढळून आला. याबाबत मार्डी येथील पोलीस पाटील सुरेश छोटू सुरत्ने (वय ४५) यांनी अकोट ग्रामीण पोलीस ठाण्यात माहिती दिली.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित इसम गेल्या एक महिन्यापासून परिसरात वेडसर अवस्थेत फिरताना दिसत होता. घटनेनंतर पोलिसांनी मर्ग क्र. १५/२०२६, कलम १९४ बी.एन.एस.एस. २०२३ अंतर्गत नोंद करून तपास सुरू केला आहे.

मृत व्यक्तीचे वर्णन असे —

उंची अंदाजे ५ फूट २ इंच, बांधा सडपातळ, रंग सावळा, केस काळे व वाढलेले. अंगात पांढऱ्या मळकट रंगाचा फुलबाह्यांचा शर्ट आणि काळसर मळकट रंगाची फुलपॅन्ट होती.

सदर अनोळखी इसमाचा मृतदेह सध्या ग्रामीण रुग्णालय, अकोट येथील शवागृहात ठेवण्यात आला आहे. ओळख पटविण्यासाठी पोलीसांकडून शोधमोहीम सुरू असून, नागरिकांनी सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले आहे.

मृत व्यक्तीबाबत कोणतीही माहिती असल्यास तपास अधिकारी स.फौ. वासुदेव ठोसरे (मो.९६३७८९६९७८), पो.हे.कॉ. सागर नागे (मो. ८७८८२८२०५६) किंवा पोलीस निरीक्षक किशोर जुनघरे (मो.८८०५९८७४५८) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# महात्मा फुले जयंती शोभायात्रेत नंदीकेश्वर व्यायाम शाळेच्या मुलींचे लेझीम पथक आकर्षण

## क्रांतीसुर्य ज्योतिराव फुले उत्सव समितीचा पुढाकार

प्रतिनिधी २३ एप्रिल





**अकोट:** शहरांमधील संत शिरोमणी सावता माळी स्मारक फुले चौक सोमवार वेस आकोट येथील क्रांतीसुर्य ज्योतिराव फुले उत्सव समितीच्या पुढाकाराने शिवजयंतीचे शिल्पकार, स्त्री शिक्षणाचे अग्रदूत, क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्ताने शोभायात्रा काढण्यात आली.

संत शिरोमणी स्मारक येथील संत सावता व ज्योतिराव फुले व आई सावित्रीबाई फुले यांच्या फोटो प्रतिमेचे पूजन करून हार अर्पण समाज बांधवांनी व इतरही फुले प्रेमींनी पुष्पहार वाहिले व सायंकाळी नंदिकेश्वर मंदिर प्रांगणातून सजवलेल्या रथावर ज्योतिराव फुले यांच्या प्रतिमा विराजमान करून शहर ठाणेदार अमोल माळवे यांच्या प्रमुख उपस्थितीत पूजन केले. भव्य मिरवणुकीला ठजय ज्योती जय क्रांतीच्याठ जयगोषामध्ये , ठएक था माळी लाखाला भारीठया बहारदार गीतावर फुले फुले प्रेमी तरुण पिढीने मन मुराद नृत्यावर आनंद घेतला व सोमवार वेस् येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विहारांमध्ये पूजन व पुष्पहार वाहिले, मिरवणुकीमध्ये विशेष आकर्षण नंदिकेश्वर महिला व्यायाम शाळा चिमुकल्या विद्यार्थिनींचे चित्त थरारक आखाडे लाठी काठी, तलवारबाजी केली. गवळीपुरा येथे नगरसेवक अमोल पालेकर , नगरसेवक जितेश बरेठिया, नगरसेवक चेतन मर्दाने, राजेश नागमते यांनी उत्सव समिती पदाधिकाऱ्यांचा सत्कार केला. शेठ सोनू चौक येथे सक्षम सामाजिक संघटना अनिकेत पोतले, बजरंग मिसळे, शुभम गावंडे, पवन माकोडे यांनी पूजन फुल पुष्प वाहून आयोजक मंडळींचा स्वागत सत्कार केला, व मिरवणूक जागेवर येऊन सर्व समाज बांधवांचे आयोजन समितीकडून आभार मानण्यात आले. मयूर निमकर, महेश खलोकार, अजय काळे, हर्षल खासबागे, सुहास पवार, मोहित शेंडे, शुभम बोरोडे, सुमित येवतकर, प्रणय शेगोकार, सचिन काळे, शुभम शेगोकार, रोशन काळे, मोहित दिंडोकार, गणेश बोरोडे, आशिष बेलोकार, अँड प्रशिश उपाशे, नंदकिशोर शेगोकार, आचल बेलसरे नगरसेवक, सचिन जुनगरे नगरसेवक, प्रथमेश बोरोडे उपनगराध्यक्ष, शिवम बोरोडे आरंभ इव्हेंट डेकोरेशन यांचे विशेष सहकार्य लाभले.

## करोडी फाटा ते जऊळखेड रस्ता बांधकाम संदर्भात प्रहारचे निवेदन



**अकोट:** करोडी फाटा ते नऊळखेड पर्यतचा रस्ता गेल्या चार महिन्या पासून अर्धवट असून वेळोवेळी बांधकाम ठेकेदाराला विनंती केल्यावर सुद्धा रोडचे काम सुरु होत नाही. याकडे प्रहारचे नेते जीवन खवले यांनी लक्ष वेधले आहे. तसेच संबंधित अधिका-यांना निवेदन दिले.

चार महिन्यामध्ये दहा ते पंधरा अपघात झाले. कोणतीही चुकी नसल्यावरही ज+नतेला त्रास भोगावा लागत आहे. आठ दिवसा मध्ये काम सुरू केले नाही तर प्रहार जनशक्ती पक्षाकडून रोडवर बसून तीव्र आंदोलन केले जाईल असा इशारा दिला.

# विठ्ठल-विठ्ठलच्या गजरात रंगला भजन महोत्सव, श्रोते तल्लीन







प्रतिनिधी २३ एप्रिल

**अकोला :** शहरातील गीता नगर परिसरातील स्वामी नारायण मंदिराजवळील प्रांगणात काल रात्री भव्य 'अर्जी खाटू नरेश भजन महोत्सव' उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या प्रारंभी श्री श्याम बाबा, सालासर बालाजी, झुलेलाल तसेच ज्योतीचे वेदमंत्रांनी पूजन करण्यात आले. यानंतर अकोल्याचे सुप्रसिद्ध भजन गायक गोपाल शर्मा तसेच नागपूर येथील भजन गायिका निहारिका पुरोहित यांनी आपल्या सुरेल आवाजात भावपूर्ण भजने सादर केली. मध्यप्रदेशातील मंदसौर येथून विशेषतः आलेल्या अधिष्ठा व अनुश्का या भगिनींनी श्री श्याम बाबा, सालासर हनुमानजी महाराज, उज्जैनचे महाकाल तसेच सांवरिया सेठ यांच्यावर आधारित हिंदी, मराठी व राजस्थानी भजनांची अप्रतिम मैफल रंगवली.

महाराष्ट्राचे आराध्य दैवत पंढरपूरचे विठ्ठल-रुक्माई यांच्यावर 'विठ्ठल विठ्ठल विठ्ठला' हे भजन सादर होताच उपस्थित श्रोते मंत्रमुग्ध होऊन ठेका धरत झूमू लागले. संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. श्री श्याम प्रेमी परिवाराच्या वतीने आयोजित या भजन महोत्सवाला अकोल्यासह विदर्भातील अमरावती, नागपूर, वर्धा, यवतमाळ, खामगाव, बुलढाणा, शेगाव तसेच महाराष्ट्रातील विविध शहरांमधून मोठ्या संख्येने श्यामभक्त उपस्थित होते. भक्तांनी भजनांचा आनंद घेत प्रभू श्री श्याम सेवा व ज्योतीचे आशीर्वादही प्राप्त केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री श्याम प्रेमी परिवार व सर्व श्यामभक्तांनी परिश्रम घेतले.

# 'भरारी' ग्रामसंघ आणि उमेद अभियानांतर्गत 'पोषण पंधरवाडा' उत्साहात साजरा

प्रतिनिधी २३ एप्रिल




**हिवरखेड:** परिसरात महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) अंतर्गत, भरारी ग्रामसंघ महिला बचत गटाच्या वतीने 'पोषण पंधरवाडा' कार्यक्रम अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून महिला आणि बालकांच्या आरोग्यासाठी सकस आहाराचे महत्त्व पटवून देण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आली. या वेळी महिला शक्ती प्रभाग संघाच्या अध्यक्ष सविता पंचबुद्दे , सचिव . उषा राठोड, अश्विनी ठाकरे संगीता इंगोले, प्रिया राठी, अर्चना गावंडे, सविता वसु हजर होते.यावेळी ग्रामसंघाच्या महिलांनी स्थानिक स्तरावर उपलब्ध असलेल्या पालेभाज्या, फळे आणि तृणधान्यांचे रांगोळी काढण्यात आल्या होते. 'उमेद' अभियानाच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या उपक्रमात, कुपोषण निर्मूलन आणि सुदृढ आरोग्यासाठी रोजच्या आहारात कोणत्या घटकांचा समावेश असावा, याबद्दल सविस्तर माहिती देण्यात आली.

भरारी ग्रामसंघाच्या पदाधिकाऱ्यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, 'घरातील प्रत्येक व्यक्तीचे आरोग्य हे गृहिणीच्या हातातील अन्नावर अवलंबून असते. त्यामुळे महिलांनी स्वतःच्या आणि मुलांच्या पोषणाकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे.' यावेळी महिलांनी 'पोषण शपथ' घेऊन आरोग्यदायी जीवनशैली अंगीकारण्याचा संकल्प केला. प्रभात फेरी द्वारे महत्व सांगितले.रांगोळी स्पर्धा मध्ये पहिला क्रमांक जया सोनोने जय वडेखणमहिला बचत गट, दुसरा क्रमांक जय गट भारती गावंडे, तर तिसरा क्रमांक भाविक गटातील ज्योती गाडेकर ह्या विजयी झाल्या.

# हातरुणमध्ये गुटखा विक्रेत्यावर पोलिसांचा छापा

प्रतिनिधी २३ एप्रिल




**हातरुण:** गावात प्रतिबंधित गुटखा विक्रीविरोधात उरळ पोलिसांनी कारवाई करत गुटखा विक्रेत्यावर गुन्हा दाखल केला आहे. दिनांक २१ एप्रिल २०२६ रोजी करण्यात आलेल्या या कारवाईत सुमारे १८,५७४ रुपयांचा प्रतिबंधित गुटखा व पानमसाला जप्त करण्यात आला.

मिळालेल्या माहितीनुसार, उरळ पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग सुरू असताना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, हातरुण गावातील एका चहाच्या टपरीवर शासनाने बंदी घातलेला गुटखा आणि पानमसाला विक्री करत आहे.

या माहितीच्या आधारे पोलिसांनी पंचांसमवेत संबंधित ठिकाणी छापा टाकून झडती घेतली असता, विविध प्रकारचा प्रतिबंधित गुटखा आढळून आला. पोलिसांनी तात्काळ मुद्देमाल जप्त करून संबंधितावर भारतीय दंड संहितेच्या कलम २२३, २७४, २७५, १२३ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

या कारवाईनंतरही परिसरात गुटखा माफियांचे जाळे सक्रिय असल्याचे वास्तव समोर आले आहे. निंबा फाटा परिसरासह ग्रामीण भागात आजही दिवसाढवळ्या गुटखा विक्री सुरू असल्याची गंभीर बाब उघड झाली आहे. प्रतिबंधित गुटखा आणि सुगंधी पानमसाला सहज उपलब्ध आहे. मोठे डिलर चारचाकी वाहनातून गावोगावी पुरवठा करत आहेत. मात्र, कारवाई फक्त छोट्या टपऱ्यांपुरतीच मर्यादित असल्याचा आरोप स्थानिक नागरिका करीत आहेत. गुटखा हा आरोग्यास घातक असूनही अन्न व औषध प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. मोठ्या गुटखा माफियांवर अद्याप ठोस कारवाई का होत नाही? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

> हातरुण आणि निंबा फाटा परिसरातील नागरिकांचे लक्ष आता एका गोष्टीकडे लागले आहे. मोठ्या गुटखा माफियांवर कधी होणार मोठी कारवाई?
>
> **काझी महेंदी हसन,**
> हातरुण

समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचालित एफ ५२२६

मॉं. गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय

गायत्री नगर. अकोला

आम्ही गुणवत्ता पाहून प्रवेश देत नाही तर, प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकामध्ये गुणवत्ता निर्माण करतो!

वैशिष्ट्ये :
- अनुभवी शिक्षकवृंद
- सुसज्ज पायाभूत ईमारत
- दर्जेदार अभ्यासक्रमासोबत नाविण्यपूर्ण उपक्रम
- सर्व पुस्तकांनी युक्त वाचनालय
- आनंददायी शिक्षण पध्दती
- CCTV ची सुविधा
- कला, संस्कृती, क्रिडा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासावर भर
- सुसज्ज प्रयोगशाळा

इयत्ता १ ली ते १० वी साठी प्रवेश देणे सुरु आहे.
- इयत्ता १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश
- इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत बससेवा उपलब्ध
- शालेय पोषण आहार



मॉं गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालय

मो. ९९२११८६७१५, ९५११२५४९५९, ९४२१८९५७९०, ९९६०४३७३६६

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
गुरुवार, दि. २३ एप्रिल २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# तर आदिवासीमंत्री अशोक उईके यांनी राजीनामा द्यावा

## ३४ मुली पळविल्याचे प्रकरण : आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी

प्रतिनिधी २३ एप्रिल


**राळेगाव / यवतमाळ :** राळेगाव व परिसरातून ३४ मुलींना पळवून नेऊन धर्मांतर व शारीरिक शोषण केल्याचा गंभीर दावा केला आहे. त्यानंतर त्याच दाव्याचे विविध स्तरांवरून खंडन झाले आहे. यामुळे यवतमाळ जिल्ह्यात राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय पातळीवर मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणात नेमके सत्य काय, याबाबत संभ्रमाचे वातावरण असून, सखोल चौकशीची मागणी जोर धरत आहे. "जर खरोखरच ३४ मुली पळविल्या गेल्या असतील, तर संबंधित विभागाचे मंत्री म्हणून अशोक उईके यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा," अशी प्रतिक्रीया माजीमंत्री प्रा. वसंत पुरके यांनी व्यक्त केली आहे.

प्रा. पुरके पुढे म्हणतात, इतक्या गंभीर स्वरूपाच्या आरोपांकडे प्रशासनाने दुर्लक्ष करू नये. "जर खरोखरच ३४ मुली पळविल्या गेल्या असतील, तर ही अत्यंत गंभीर बाब असून संबंधित दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे. मात्र, अशी कोणतीही घटना घडली नसल्यास समाजात द्वेष पसरवणाऱ्यांवरही तितकीच कठोर कारवाई व्हावी," असे त्यांनी स्पष्ट केले. राळेगाव व अन्य परिसरातून ३४ मुलींना पळवून नेण्यात आल्याचा आणि त्यांचे धर्मांतर तसेच शारीरिक शोषण झाल्याचा आरोप आरएसएसचे कार्यतर्के व भाजपाचे जिल्हाध्यक्ष ॲड. प्रफुल चौहान यांनी केला आहे. या वेळी आदिवासी मंत्री अशोक उईके यांची कन्या तथा यवतमाळ नगराध्यक्ष प्रियदर्शनी उईके यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते. मात्र, या दाव्याला भाजपचेच आ. राजु तोडसाम यांनी सार्वजनिकरित्या छेद दिला. त्यांनी व्हिडिओ संदेशाद्वारे "मुली पळवून नेल्याचा कोणताही प्रकार घडलेला नाही," असे स्पष्ट करत, अशा प्रकारच्या माहितीमुळे समाजात गैरसमज निर्माण होऊ शकतो, असेही सूचित केले. एकाच पक्षातील नेत्यांकडून परस्परविरोधी भूमिका मांडल्या गेल्याने या प्रकरणाची गुंतागुंत अधिकच वाढली आहे. दरम्यान, जिल्हा पोलिस अधिक्षक कुमार चिंता यांनीही अशा प्रकारची कोणतीही घटना घडली नसल्याचे प्राथमिक तपासात आढळल्याचे सांगितले आहे. प्रा. पुरके पुढे म्हणातात की, "आदिवासी समाजाच्या नावाने चुकीची माहिती पसरवून सामाजिक तणाव निर्माण करण्याचा प्रयत्न होऊ शकतो. धर्माच्या आधारावर द्वेष पसरल्यास त्याचे परिणाम गंभीर होतात. त्यामुळे प्रशासनाने वस्तुनिष्ठ पाहणी करून सत्य जनतेसमोर आणणे गरजेचे आहे." त्यांनी राज्याचे गृहमंत्री आणि मुख्यमंत्री यांनी या प्रकरणाची दखल घेऊन उच्चस्तरीय चौकशी करावी, अशी मागणी केली.

तसेच, जर खरोखरच मुली बेपत्ता असतील, तर त्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत देण्यात यावी आणि त्यांच्या ओळखी गोपनीय ठेवून संवेदनशीलतेने प्रकरण हाताळावे, असेही त्यांनी सुचवले. उलट, जर अशा घटना घडल्या नसतील, तर धर्मद्वेष पसरवणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. या संपूर्ण घडामोडींमुळे यवतमाळ जिल्ह्यातील कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला असून, प्रशासनाने तातडीने स्पष्ट भूमिका घेऊन वस्तुस्थिती समोर आणावी, अशी मागणी त्यांनी केली.

# रावेरीच्या मंदिरात सीता नवमी महोत्सव

## नऊ महिलांचा 'स्वयंसिध्दा सिता सन्मान'



प्रतिनिधी २३ एप्रिल

**यवतमाळ :** शेतकरी संघटनेचे संस्थापक युगात्मा शरद जोशी यांनी जिर्णोद्धार केलेल्या यवतमाळ जिल्ह्यातील राळेगाव तालुक्यातील रावेरी येथील प्राचीन सीता मंदिर परिसरात शनिवार ता.२५ एप्रिला दुपारी १२ वाजता सीतानवमीच्या पावन पर्वावर श्रीमती गिताबाई उत्तमराव झोटींग सिंगलदीप जि. यवतमाळ, श्रीमतीविमल बंडु शेळके रेवगाव जि. जालना, श्रीमती मंगला मोहन घडे वर्धा, श्रीमती ज्योती यशवंत खांडेकर नागपुर, श्रीमती संध्या शिरीष पान्सी पाढरकवडा जि. यवतमाळ, श्रीमती शशिकला रवींद्र डोहे येरगव्हान जि. चद्रपुर, श्रीमती स्वाती अनिल धामंदे वर्धा, श्रीमती सुनिता विजय कातखेडे धामनगाव जि. अमरावती, श्रीमती अल्का गणेश शिंदे नेक नांनपूर जि. अमरावती, या नऊ महिलाना २०२६चा स्वयंसिध्दा सीता सन्मान पुरस्कार जाहीर करण्यात आला. दरवर्षीप्रमाणे सीतानवमी पावन पर्वावर स्वयंसिध्दा सीता सन्मान पुरस्कार सोहळ्याचे आयोजन केले आहे.

हा कार्यक्रम शेतकरी संघटना, शेतकरी महिला आघाडी व हनुमान देवस्थान ट्रस्ट, रावेरी तर्फे दरवर्षी आयोजित करण्यात येत असतो. या सोहळ्यात ज्या महिलांनी पतीच्या निधनानंतर किंवा घटस्फोटानंतर हिंमत न हारता संयमाने विपरीत परिस्तिशी व समाजव्यवस्थेशी संघर्ष करुन लव-कुशा प्रमाणे पायावर उभे करून आत्मनिर्भर व समाजातील प्रतिष्ठीत आणि सन्माननीय नागरीक म्हणून घडवले आहे. अशा कर्तुत्ववान धैर्यशील महाराष्ट्रातील नऊ मातांचा भावपूर्ण सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष शेतकरी संघटनेचे माजी अध्यक्ष व माजी आमदार ॲड. वामन चटप, उद्घाटक माजी आमदार सरोज काशीकर,विशेष उपस्थिती सविताताई कौशिक कार्यकारी संचालक एबीपी माझा टि व्ही चॅनल, मुबंई, शे. म. आघाडी अध्यक्ष प्रज्ञा बापट, स्व.



भा. पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल घनवट, शेतकरी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष ललित बहाळे, शेतकरी संघटना तंत्रज्ञान विज्ञान विस्तार आघाडी प्रदेशाध्यक्ष मिलिंद दामले, शेतकरी संघटनेचे मधुसूदन हरणे, स्व. भा. पार्टीचे माजी प्रांताध्यक्ष ॲड. दिनेश शर्मा, प्रदेशाध्यक्ष स्व. भा. पा. महिला आघाडी प्रदेशाध्याक्ष सिमा नरोडे, शैलाताई देशपांडे माजी प्रांताध्यक्ष माजी प्रांताध्यक्ष शे. स. महिला आघाडी, गीताताई खांदेभराड, माजी प्रांताध्यक्ष शे. म. आघाडी, गुणवंत पाटील हंगरगेकर माजी अध्यक्ष शे. स., दिपक चटप प्रदेशाध्यक्ष युवा आघाडी शेतकरी संघटना, विजय निवल प्रदेशाध्यक्ष व्यापार आघाडी, राजाभाऊ पुसदेकर बळीराज्य विदर्भ प्रमुख, सतीश दाणी माजी युवा आघाडी अध्यक्ष, बाळासाहेब देशमुख अध्यक्ष हनुमान देवस्थान कमिटी, राजेंद्र तेलंगे सरपंच,वर्षाताई तेलंगे संचलिका जि म स बॅक, उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाचे निमत्रंक शेतकरी संघटना महिला आघाडी, सीता नवमी उत्सव समिती, असुन या कार्यक्रमाला उपस्थीत राहण्याचे आव्हान शेतकरी संघटना, शेतकरी महिला आघाडी, शेतकरी युवा आघाडी व स्वतंत्र भारत पक्ष तसेच गणेश मुटे, सारंग दरणे, अक्षय महाजन, गोपाल भोयर, भास्कर पाटील, गिरीश तुरके, प्रकाश काकडे, रावेरीचे उपसरपंच गजानन झोटींग, संदीप तेलंगे, यवतमाळ जिल्हाध्यक्ष राजेंद्र झोटींग, महिला आघाडी यवतमाळ जिल्हाध्यक्ष सोनाली मरगडे यांनी केले आहे.

# घरपोच गॅस वितरणाचा बट्ट्याबोळ; ग्राहकांना बसस्थानकावरूनच सिलेंडर उचलण्याची सक्ती

प्रतिनिधी २३ एप्रिल



**उमरखेड :** घरपोच गॅस सिलेंडर देणे बंधनकारक असताना उमरखेड तालुक्यातील विडुळ येथे मात्र याला पूर्णपणे हरताळ फासण्यात आला आहे. भर उन्हात बसस्थानकावर गॅस सिलेंडरची गाडी उभी करून ग्राहकांनाच सिलेंडर घेण्यासाठी बोलावले जात असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे गॅसधारकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. देशात काही महिन्यांपूर्वी आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळे गॅस पुरवठ्यावर परिणाम झाला होता. मात्र आता परिस्थिती सुरळीत झाली असून कुठेही तुटवडा नसल्याचे शासन आणि संबंधित एजन्सीकडून स्पष्ट करण्यात आले आहे. तरीही विडुळ येथे गॅस वितरणाची सेवा पूर्ववत झालेली नसल्याचे चित्र आहे.

नियमाप्रमाणे घरपोच सिलेंडर देणे अपेक्षित असताना येथील डिलिव्हरी बॉय बसस्थानकावरूनच वितरण करत आहे. त्यामुळे महिला, मजूर व ज्येष्ठ नागरिकांना कडक उन्हात तासन्तास थांबून सिलेंडर घ्यावा लागत आहे. यामुळे त्यांना शारीरिक, मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे. याशिवाय, प्रति सिलेंडर निश्चित दर ९३८ रुपये असताना ग्राहकांकडून ९७० ते ९८० रुपये आकारले जात असल्याची तक्रार आहे. वाहतूक खर्चाच्या नावाखाली प्रत्येकी ४० ते ५० रुपये अतिरिक्त घेतले जात असल्याचे गॅसधारकांचे म्हणणे आहे. दररोज सुमारे ५० ते ६० सिलेंडरचे वितरण होत असल्याने यामधून मोठ्या प्रमाणात आर्थिक वसुली होत असल्याचा आरोप आहे. दरम्यान, संबंधित गॅस एजन्सीने तातडीने लक्ष घालून घरपोच सेवा सुरळीत करावी, तसेच अतिरिक्त वसुली थांबवावी, अशी मागणी विडुळ येथील नागरिकांकडून होत आहे.

### गावात गेल्यास त्रास होतो : डिलिव्हरी बॉय

■ याबाबत संबंधित डिलिव्हरी बॉयला विचारणा केली असता, "गावात गाडी नेल्यावर काही ग्राहकांकडून वाद घालण्यात येतो, कधी कधी अंगावरही येतात. त्यामुळेच मी गावात घरपोच वितरण करत नाही," असे स्पष्टीकरण त्याने दिले.

# पीएम आवास योजनेचे अनुदान रखडले; दिग्रस नगर परिषदेकडून पाठपुराव्यात कुचराई

प्रतिनिधी २३ एप्रिल



**दिग्रस :** शहरातील प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत निवड झालेल्या लाभार्थ्यांचे अनुदान प्रलंबित राहिल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. घरकुलाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी शासनाकडून मंजूर झालेली आर्थिक मदत वेळेत न मिळाल्याने अनेक कुटुंबे आर्थिक अडचणीत सापडली आहेत.

लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करूनही अनुदानाची रक्कम त्यांच्या खात्यात जमा होत नसल्याची तक्रार आहे. यासाठी नगर परिषद कार्यालयात वारंवार हेलपाटे मारूनही कोणताही ठोस तोडगा निघत नसल्याचे नागरिक सांगतात. काहींनी बांधकाम सुरू केले असले तरी निधीअभावी कामे अर्धवट अवस्थेत थांबली आहेत.

दरम्यान, नगर परिषद प्रशासनाकडून शासन स्तरावर प्रभावी पाठपुरावा होत नसल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. अनुदानात होणाऱ्या विलंबामुळे बांधकामाचा खर्च वाढत असून, कर्जाचा बोजाही वाढत आहे. परिणामी लाभार्थ्यांची आर्थिक परिस्थिती अधिकच बिकट होत आहे.

लवकरात लवकर प्रलंबित अनुदान वितरित करून नागरिकांना दिलासा द्यावा, तसेच संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालून प्रभावी पाठपुरावा करावा, अशी मागणी लाभार्थ्यांकडून होत आहे.

# दिग्रस भाजप महिला आघाडीच्या शहराध्यक्षपदी जागृती मेहता

प्रतिनिधी २३ एप्रिल



**दिग्रस :** भारतीय जनता पक्षाच्या दिग्रस शहर महिला आघाडीच्या अध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्त्या जागृती सतीश मेहता यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे शहरातील महिला संघटनात्मक कार्याला बळ मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

जागृती मेहता या येथील राष्ट्रीय विद्यालयाच्या संचालिका असून त्यांनी सामाजिक क्षेत्रात सक्रिय सहभाग नोंदविला आहे. त्यांच्या जनसंपर्क आणि प्रयत्नांमुळे त्यांच्या सासू लक्ष्मीबाई मेहता या नगरसेविका म्हणून निवडून आल्या होत्या. विशेष म्हणजे तब्बल २७ वर्षांनंतर भाजपला शहरात पहिला नगरसेवक मिळण्यामागे त्यांच्या कार्याचा मोठा वाटा असल्याचे मानले जाते.

त्यांच्या कार्याची दखल घेत भाजपने त्यांच्यावर महिला आघाडी शहराध्यक्षपदाची जबाबदारी सोपविली आहे. यावेळी यवतमाळ-पुसद जिल्हा समन्वयक नितीन भुतडा, जिल्हा महामंत्री दत्ता राहणे, जिल्हा उपाध्यक्ष डॉ. गजानन निचत तसेच शहराध्यक्ष अभय इंगळे उपस्थित होते. जिल्हाध्यक्षा डॉ. आरती फुपाटे यांनी त्यांना नियुक्तीपत्र प्रदान केले.

नियुक्तीनंतर बोलताना जागृती मेहता यांनी शहरात भाजपचे मजबूत महिला संघटन उभे करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. त्यांच्या नियुक्तीमुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# हेल्मेट एक जीवरक्षक; अपघातातील मृत्यू कमी करण्यासाठी वापर अनिवार्य

प्रतिनिधी २३ एप्रिल

**उमरखेड :** दुचाकी अपघातांमध्ये वाढते मृत्यूचे प्रमाण लक्षात घेता चालकांनी हेल्मेटचा वापर करणे अत्यावश्यक असल्याचे आवाहन वाहतूक उपशाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल गुंडे यांनी केले आहे.



उपविभागाअंतर्गत सन 2025 मध्ये एकूण 36 प्राणघातक अपघातांची नोंद झाली होती. तर 20 एप्रिल 2026 पर्यंत 13 अपघातांची भर पडून एकूण 49 अपघात घडले आहेत. यातील सुमारे 95 टक्के अपघात हे विनाहेल्मेट दुचाकीस्वारांशी संबंधित असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

हेल्मेटचा वापर केला असता सुमारे 90 टक्के मृत्यू टाळता आले असते, असेही पोलिसांनी नमूद केले आहे. विशेष म्हणजे अपघातातील मृतांपैकी 70 ते 75 टक्के युवक हे 30 वर्षांखालील असल्याने ही बाब अधिक चिंताजनक ठरत आहे.

रस्ते अपघातांमध्ये वाढते मृत्यूचे प्रमाण लक्षात घेता जनतेतूनच हेल्मेट वापराबाबत जनजागृती होणे गरजेचे आहे. हेल्मेटचा वापर केल्यास जीवितहानी टाळता येऊ शकते, त्यामुळे सर्व दुचाकीस्वारांनी हेल्मेटचा वापर करावा, असे आवाहन अमोल गुंडे यांनी केले आहे.

### कठोर कारवाईची गरज

■ अपघातातील मृत्यूंचे प्रमाण कमी करण्यासाठी पोलीस विभागाने हेल्मेट सक्तीबाबत कठोर कारवाई केल्यास वाढत्या अपघातांना आळा बसू शकतो, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# शेतात आढळला युवकाचा मृतदेह

प्रतिनिधी २३ एप्रिल

**कळंब :** तिरझडा येथे एका इसमाचा मृतदेह त्याच्या शेतात आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. विजय शांताराम वाईकर (वय ४८) असे मृतकाचे नाव आहे. ते १९ एप्रिलपासून कोणालाही न सांगता घरातून निघून गेले होते. दरम्यान, बुधवार २२ रोजी दुपारी त्यांच्या शेताच्या धुऱ्यावर त्यांचा मृतदेह आढळून आला. पोलिस जमादार नितीन कडुकर यांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, वाईकर यांचा मृत्यू उष्माघातामुळे झाल्याची शक्यता आहे. मात्र, मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदन अहवालानंतर स्पष्ट होणार आहे. मृतकाच्या पश्चात पत्नी, एक मुलगा आणि एक मुलगी असा परिवार आहे.

# उमरखेडचा पारा ४२ अंशांवर; अमोना-पोफाळी तलाव कोरडे पडण्याच्या मार्गावर

प्रतिनिधी २३ एप्रिल



**उमरखेड :** तालुक्यात उष्णतेची तीव्रता कमालीची वाढली असून तापमानाने ४२ अंशांचा टप्पा गाठला आहे. गेल्या आठ ते दहा दिवसांपासून वाढत्या उष्णतेमुळे जनजीवन त्रस्त झाले असून जलस्रोतांवर त्याचा थेट परिणाम दिसून येत आहे. शहरालगत असलेल्या अमोना तसेच पोफाळी येथील तलावातील पाण्याची पातळी झपाट्याने घटत आहे.

मार्च महिन्यापासूनच पाण्याची पातळी कमी होण्यास सुरुवात झाली होती. एप्रिलमध्ये तापमानात मोठी वाढ झाल्याने तलाव आटण्याच्या स्थितीत आले आहेत.

दुपारी १२ ते ४ या वेळेत उन्हाचा तडाखा इतका तीव्र आहे की नागरिकांना घराबाहेर पडणेही अवघड झाले आहे.

पोफाळी तलावावर परिसरातील अनेक गावांची शेती अवलंबून आहे. तलावातील पाणीसाठा घटल्याने सिंचनावर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली असून शेतकऱ्यांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. यामुळे पुढील काळात पाणीटंचाईचे संकट गडद होण्याची चिन्हे आहेत.

दरम्यान, जलस्त्रोत आटत असल्याने पशुपक्षी व वन्यप्राणी पाण्यासाठी भटकंती करत आहेत. भूजल पातळीही खालावल्याने विहिरी व बोअरवेल कोरड्या पडत आहेत. अनेक तळे आटल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

### कृत्रिम पाणवठ्यांची गरज

■ जंगलातील नैसर्गिक जलस्रोत कोरडे पडत असल्याने वन्यप्राण्यांसाठी कृत्रिम पाणवठे निर्माण करावेत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. वन विभागाने तातडीने उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

# दिग्रसच्या राजकारणात निष्ठेची किंमत शून्य?

## पैशांच्या बळावर सत्ता, निष्ठावान कार्यकर्ते रस्त्यावर; संतापाचा स्फोट

प्रतिनिधी २३ एप्रिल



**दिग्रस :** शहरातील राजकारणात सध्या निष्ठा, त्याग आणि प्रामाणिकपणाचा सरळसरळ बळी जात असल्याचे उघड चित्र समोर आले आहे. एकेकाळी पक्ष उभा करणारे, संकटात खांद्याला खांदा लावून उभे राहणारे कार्यकर्ते आज पूर्णपणे बाजूला फेकले गेले आहेत.

आज परिस्थिती अशी आहे की, ज्यांच्याकडे पैसा आहे तेच नेत्यांच्या जवळ आणि ज्यांनी आयुष्य घालवले ते कार्यकर्ते मात्र दाराबाहेर! व्यावसायिक, पांढरपेशी आणि "इन्व्हेस्टमेंट" करणारे लोक राजकारणावर ताबा मिळवत आहेत, तर निष्ठावान कार्यकर्ते उपेक्षेच्या खाईत ढकलले जात आहेत. सर्वात संतापजनक बाब म्हणजे आयाराम-गयाराम, दलबदलू प्रवृत्तीचे लोक आज नेत्यांच्या गळ्यातले ताईत बनले आहेत. कालपर्यंत विरोधात असलेले आज जवळचे, आणि वर्षानुवर्षे निष्ठेने काम करणारे कार्यकर्ते मात्र दूर लोटले गेले हीच आजची कडवी वस्तुस्थिती आहे. स्थानिक राजकारणात आता उघडपणे "पैसे लावा आणि पैसे कमवा" हा धंदा सुरू झाल्याची चर्चा आहे. राजकारण हे सेवा न राहता व्यवहार बनले आहे. पैसा घाला, पद मिळवा आणि त्यातून नफा कमवा — अशीच नवी पद्धत रूढ होत असल्याचा आरोप कार्यकर्त्यांतून होत आहे. यामुळे संतप्त कार्यकर्ते आता थेट सवाल करत आहेत "आम्ही फक्त बॅनर लावणारे, खुर्च्या उचलणारे, सभा भरवणारे आणि निवडणुकीत जीव तोडून तुम्हाला जिंकवणारे आहोत का?, आमच्या निष्ठेची हीच किंमत?" अनेकांनी आपल्या आयुष्याचा उमेदीचा काळ नेत्यांसाठी झिजवला, कुटुंबाकडे दुर्लक्ष केले, स्वतःच्या भविष्याचा विचार न करता पक्षासाठी रात्रंदिवस झटले पण आज त्यांच्या हाती शून्यच उरले आहे.

जर हीच परिस्थिती कायम राहिली, तर येत्या काळात "कार्यकर्ता" ही संकल्पनाच संपुष्टात येईल, असा इशारा दिला जात आहे. कारण स्वार्थी आणि पैशावर चालणाऱ्या राजकारणात निष्ठेला स्थान उरणार नाही.

सिटी न्यूज अमरावती

गुरुवार, दि.२३ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## रोजगार मेळाव्यात ६३ उमेदवारांची निवड

**अमरावती:** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि मॉडेल करिअर सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, दि. २१ एप्रिल रोजी आयोजित पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्यात ६३ उमेदवारांची निवड करण्यात आली.

जिल्हा कौशल्य विकास केंद्राच्या सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर अध्यक्षस्थानी होत्या. यावेळी तयांनी उमेदवारांनी आपल्या रोजगाराप्रती नेहमी जागृत आणि उत्साही असावे, असे सांगून कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या कामाचेही कौतुक केले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कृपा अर्गुलेवर, संदीप यादव, पंकज कचरे उपस्थित होते. आकाश येवले यांनी सूत्रसंचालन केले, पंकज कचरे यांनी आभार मानले.

# अमरावती जिल्ह्यात 627 रुग्णांना सुमारे 5.28 कोटींची मदत

प्रतिनिधी २३ एप्रिल

**अमरावती :** शासनाच्या आरोग्यविषयक विविध योजनांमधून मदत न मिळालेल्या पात्र व गरजू रुग्णांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी 'आधार' ठरत आहे. अमरावती जिल्ह्यात आर्थिक वर्षात ६२७ रुग्णांना सुमारे ५ कोटी २८ लाख रुपयांची वैद्यकीय आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून जिल्हा कक्षाची स्थापना, पेपरलेस अर्ज प्रक्रिया, तातडीने अर्जाचा निपटारा करणे आदी सकारात्मक बदल करण्यात आले. त्यासोबतच सामंजस्य करार, क्राउड फंडिंग आदींच्या माध्यमातून समाजातील मदत करणारे रूग्णालय, धर्मादाय रूग्णालय, संस्था, दाते आदींच्या सहकार्य लाभत आहे.

**२० गंभीर आजारासाठी मदत**

कॉक्लियर इम्प्लांट (वय वर्ष २ ते ६), हृदय, यकृत, किडनी, फुफ्फुस, बोन मॅरो, हाताचे, गुडघ्याचे प्रत्यारोपण, हिप रिप्लेसमेंट, कर्करोग शस्त्रक्रिया, रस्ते अपघात, लहान बालकांची शस्त्रक्रिया, मेंदूचे आजार, हृदयरोग, डायालिसिस, कर्करोग (केमोथेरपी / रेडिएशन), अस्थिबंधन, नवजात शिशुंचे आजार, बर्न (भाजलेले) रुग्ण, विद्युत अपघात रुग्ण या अशा एकूण २० गंभीर आजारांसाठी अर्थसहाय्य दिले जाते.

मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या कार्यपद्धतीत केलेल्या सुधारणा आणि मदतीचे विविध मार्ग उपलब्ध करून दिल्याने पारदर्शकता वाढून मदत वितरणाचा वेग लक्षणीयरित्या वाढला आहे. परिणामी, अधिकाधिक पात्र रुग्णांना वेळेत आर्थिक सहाय्य मिळत आहे.

**सामंजस्य करारातून मदतीचा मार्ग मोकळा**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, बीपीसीएल फाऊंडेशन व टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात बालकांच्या कर्करोग उपचारासाठी नुकताच सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे सामाजिक दायित्व (सीएसआर) अंतर्गत उपचारांसाठी विशेष निधी उपलब्ध होणार आहे. आर्थिक अडचणी कमी होऊन गरजू बालकांना गुणवत्तापूर्ण कर्करोग उपचार सुलभ होणार आहेत.

**आर्थिक वर्षातील मदत**

१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राज्यातील तब्बल ४० हजार ७७६ रुग्णांना ३३३ कोटी ६ लाख ८१ हजार ५०० रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली आहे. तर, याच कालावधीत अमरावती जिल्ह्यातील ६२७ रुग्णांना सुमारे ५ कोटी २८ लाख ४८ हजार रुपयांची आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून राज्यातील शेकडो गरजू रुग्णांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून उपचारासाठी भक्कम आधार मिळत आहे.

## बरोदा गावात बोअरवेलची निर्मिती : युवक काँग्रेसचा पुढाकार

प्रतिनिधी २३ एप्रिल

**चिखलदरा :** बोरदा गावात पाण्याची टंचाई निर्माण झाल्यामुळे ग्रामस्थांनी वारंवार प्रशासनाला या समस्येबाबत अवगत केले परंतु प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्यामुळे या समस्येवर उपाय म्हणून गावकऱ्यांनी स्वतः लोकवर्गणी करून बोअरवेलची खुदाई केली.

त्यामध्ये चांगले पाणी लागले असून स्थानिकांनी त्या बोअरवेलची आदिवासी संस्कृतीनुसार महापूजा केली.

ही बाब शासन आणि प्रशासन दोघांनाही एक कडक चपराक देणारी आहे. यावरून हे स्पष्ट होते की मेळघाटातील स्थानिक आदिवासी केवळ शासनावर अवलंबून नसून स्वतःच्या गरजा पूर्ण करण्यास सक्षम आहेत. ही गोष्ट शासनासाठी लाजिरवाणी आहे.



या प्रसंगी त्यांनी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल येवले यांना विशेष निमंत्रित करून बोअरवेलचे उद्घाटन केले.

यावेळी छन्नु भैया, लालाजी कासडेकर, सज्जु भैया, कज्जु कासडेकर, सोमा कासडेकर यांची उपस्थिती होती.

## भाजपाचे आगार व्यवस्थापकांना निवेदन; सीसीटीव्ही बसवण्याची मागणी

प्रतिनिधी २३ एप्रिल

**दर्यापूर :** भाजप युवा मोर्चा शहर अध्यक्ष मृणाल इंगळे यांच्या नेतृत्वात आज आगार व्यवस्थापक दर्यापूर यांना म्मून् बसवन्या साठी निवेदन दिले.

यावेळी युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष विजय भारसाकळे युवा मोर्चा उप जिल्हाध्यक्ष आशिष चौधरी, गटनेते तथा नगरसेवक दिनेश भाऊ पारडे नगरसेवक रोशन भाऊ कट्यारमल, भरत भाऊ शुक्ला नंदू भाऊ कपिले, अंकुश भाऊ पाटणे, निलेश भाऊ विल्हेकर, भूषण भाऊ विल्हेकर, विकास भाऊ काट्यारमल, राहुल वानखडे, अक्षय विल्हेकर जयेश सोनाळेकर, ऋषिकेश चिकटे रोहित चंदनपत्री, राज चंदनपत्री, यश देशमुख, प्रेम बुंदीले, वेदांत गायगोले, यश ओलोकर, अथर्व सोनाळेकर व असंख्य कारकर्ते उपस्थित होते.



## नोकरीचे आमिष दाखवून धोका दिल्याबाबत न्याय दंडाधिकाऱ्यांचा आदेश औरंगबाद खंडपीठात रद्द

प्रतिनिधी २३ एप्रिल

**अमरावती :** किनवट पोलीस ठाण्यात गुन्हा १०/१०/१४ रोजी दाखल असुन यातील फिर्यादी मारोती नारायण गुट्टे रा.बोधडी (बु) ता.किनवट जि. नांदेड हे सुशिक्षीत बेकार असुन बी. एड. पर्यंत शिक्षण झाले असून २६/४/२००९ रोजी आरोपीने फिर्यादीला आश्रम शाळेवर शिक्षक पदावर नोकरी लावतो म्हणून आमिष दाखवले.

फिर्यादीने दि.५/५/२००९ रोजी आरोपीस ४,००,०००/- रुपये दिले. त्यानंतर फिर्यादी हा सदर संस्थेवर ५ वर्ष शिक्षक पदांवर काम करुन सुध्दा त्याची नेमणूक न झाल्याने फिर्यादीने आरोपीस पैश्याची मागणी केली असता आरोपीने त्यास शिवीगाळी केली व ५/३/१४ रोजी फिर्यादीस त्याच्या घरासमोर काठीने मारहाण केली. तशी फिर्याद दिली होती.

तपासात असे निष्पन्न झाले की, फिर्यादी व आरोपी यांच्या मधे कोणत्याही प्रकारचा आर्थिक व्यवहार झाला नसून साक्षीदाराकडे विचारपूस करत घडलेल्या घटने बाबत साक्षीदार व फिर्यादीने दिलेले जबाब व साक्षीदारांचे बयानात संबंध नसून विसंगती दिसून येते. गुन्हयातील आरोपींना फसवून त्यांचे नुकसान करण्याच्या उद्देशाने जुळवाजुळव करुन तांत्रिक स्वरुपाची फिर्याद दिली आहे. फिर्याद खोटी असल्याचे माहित असून देखील फिर्याद देवून शासनाचा व पोलीसांचा वेळ वाया घालवून दिशाभूल केलेली असुन हेतुपुरःसर द्वेषबुद्धीने खोटी फिर्याद दिल्याचे निष्पन्न झाले होते .

ठयठ वर्गात समरी मंजूर होण्याचा विनंती अर्ज विद्यमान मजिस्ट्रेट किनवट यांच्या समोर सादर केले असता, विद्यमान मजिस्ट्रेट किनवट ह्यांनी प्रकरणात फिर्यादीचे एकतर्फी म्हणणे ऐकून, आरोपीच्या विरोधात समन्स पाठविण्याचे निर्देश दिले व तसे आदेश २३/१/२०१७ रोजी पारित केले. आदेशाला आरोपीने एड सपना जाधव ह्यांच्या मार्फत उच्च न्यायालयात अर्ज दाखल केला व ॲड. सपना जाधव यांनी विद्यमान उच्च न्यायालया समक्ष मांडले की विद्यमान मजिस्ट्रेट कोर्टचे आदेश हे बेकायदेशीर असून आदेश पारित करत असताना कोणतेही कायदेशीर कारण मीमांसा आदेश मधे देण्यात आले नाही. पोलिसानी तक्रार दाखल केल्या नंतर सदर तक्रारीची तपासणी करून सदरची तक्रार खोटी असून आरोपी विरुद्ध खोटे गुन्हे दाखल करण्याचे प्रयत्न करण्यात आले आहेत असे स्पष्ट अहवाल देऊन ब समरी रिपोर्ट मंजूर करण्यात यावा असा अर्ज करण्यात आला त्या अर्जावर व बी समरी रिपोर्ट वर विद्यमान मजिस्ट्रेट कोर्टाने मंजूर केले किवा कसे ह्याबाबत आजपर्यंत कोणतेही आदेश पारित केले नाही आणि हलगर्जी पणाने फिर्यादी ह्यांचे म्हणणे ऐकून आरोपी विरुद्ध समन्स काढण्याचे गैरकायदेशीर आदेश पारित केले.

प्रकरणातील सर्व दस्त ऐवजाची पडताळणी करून व दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून विद्यमान उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाने मॅजिस्ट्रेट कोर्ट किनवट ह्यांनी २३/१/२०१७ रोजी पारित केलेले आदेश खारीज केले.

## चांदुर रेल्वे तालुक्यातील शिवसेना शिंदे गटातील शेकडो कार्यकर्ते युवा स्वाभिमानमध्ये

प्रतिनिधी २३ एप्रिल

**अमरावती:** शंकर नगर येथील युवा स्वाभिमान पार्टी कार्यालयात चांदुर रेल्वे तालुक्यातील शेकडो नागरिकांनी युवा स्वाभिमान पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला. वायएसपीचे मार्गदर्शक सुनील राणा यांच्या प्रमुख उपस्थितीत भव्य प्रवेश सोहळा उत्साहात पार पडला.

कार्यक्रमादरम्यान नव्याने पक्षात दाखल झालेल्या कार्यकर्त्यांचे गळ्यात पक्षाचे दुपट्टे टाकून स्वागत करण्यात आले. यावेळी परिसरात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. मोठ्या संख्येने नागरिकांनी पक्षात प्रवेश केल्यामुळे तालुक्यात पक्षाची संघटनात्मक ताकद वाढल्याचे चित्र स्पष्ट झाले. या प्रसंगी युवा स्वाभिमान पार्टीचे



राष्ट्रीय कोषाध्यक्ष शैलेंद्र कस्तुरे, गणेशदास गायकवाड, किशोर पिवाल, विनोद जायलवाल, वीनोद गूहे, नितीन बोरेकर, अवी काळे, लक्ष्मणराव लाठेकर, बाळू इंगोले सुचिता खोडे, यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून पक्षाची भूमिका, विचारधारा आणि जनतेच्या प्रश्नांवर लढण्याची बांधिलकी अधोरेखित केली.

यावेळी श्रीकांत गोसावी, अक्षय शेंडे, अक्षय सुरेशे, निखिल हाडके, अविनाश गिरी, विक्की पातोडे, अक्षय सुरेशे, प्रणित तिडके, नागेश खानंदे, किर्ती गोसावी, कविता निखारे, अर्चना बागडे, टिना बनसोड, दुर्गाबाई शेंडे, निर्मलाबाई बागडे, उषा बागडे असंख्य पदाधिकारी यांनी प्रवेश घेतला.

मार्गदर्शक सुनील राणा यांनी आपल्या भाषणात सांगितले की, ङ्गयुवा स्वाभिमान पार्टी ही सर्वसामान्य नागरिकांच्या हक्कांसाठी काम करणारी संघटना असून, पक्षात वाढत असलेला जनसमर्थन आगामी काळात मोठा बदल घडवेल.ङ्क त्यांनी नव्या कार्यकर्त्यांना जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी सक्रियपणे काम करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व नवनियुक्त कार्यकर्त्यांनी पक्ष बळकट करण्याचा निर्धार व्यक्त केला. या मोठ्या प्रवेशामुळे चांदुर रेल्वे तालुक्यात युवा स्वाभिमान पार्टीचा प्रभाव अधिक मजबूत झाल्याचे दिसून येत आहे.

## मंगळवारी कौशल्य विकास केंद्राचा रोजगार मेळावा

प्रतिनिधी २३ एप्रिल

**अमरावती:** जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रातर्फे युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी 'पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मोहिमे'चे मंगळवार, दि. २१ एप्रिल रोजी आयोजन करण्यात आले आहे. जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, शासकीय तांत्रिक विद्यालय परिसर, डेपो, रोड, जि. अमरावती येथे हा मेळावा होणार आहे.

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तथा मॉडल करिअर सेंटरतर्फे रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. मेळाव्यामध्ये विविध कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. जिल्ह्यातील युवकांना नोकरीच्या संधी मिळवून देण्यासाठी रोजगार मेळाव्यामधून प्रयत्न करण्यात येते. मेळाव्यात योजनेसाठी विविध आस्थापना, कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहून उमेदवारांच्या थेट मुलाखती घेतील. मुलाखतीनंतर पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना नोकरीची संधी मिळणार आहे.

मेळाव्यामध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांनी कागदपत्रांसह उपस्थित राहावे. याबाबत अडचणी असल्यास जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, दुरध्वनी क्रमांक ०७२१-२५६६०६६, ८९८३४१९७९९, ८६०५६५४०२५ किंवा mravatiro®ar@gmail.com या मेलवर संपर्क साधावा. मेळाव्यासाठी विद्यार्थ्यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर यांनी केले आहे.

## पारधी समाजाच्या व्यक्तींसाठी विविध योजना; अर्ज करण्याचे आवाहन

प्रतिनिधी २३ एप्रिल

**अमरावती:** धारणी एकात्मिक आदिवासी विभाग प्रकल्प कार्याक्षेत्रांतर्गत पारधी समाजाच्या विकासासाठी विविध योजना राबविण्यात येतात. या योजनांचा लाभ घेण्यासाठी अनुसूचित जमातीच्या पारधी समाजाच्या अर्जदारांकडून योजनांचे अर्ज मागविण्यात येत आहेत.

या योजनांचे विनामूल्य अर्ज वाटप व स्विकृती शासकीय आश्रमशाळा (गुल्लरघाट) कॅम्प, बाभळी ,दर्यापूर, एकात्मिक आदिवासी विभाग प्रकल्प, धारणी अंतर्गत सहायक प्रकल्प अधिकारी कार्यालय मोर्शी, उपकार्यालय, अपर आयुक्त कार्यालय अमरावती व प्रकल्प कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी येथे सुरू आहे. पारधी समाजाच्या अर्जदारांनी परिपूर्ण कागदपत्रांसह भरलेला अर्ज दिनांक ५ मे २०२२ पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावेत. या योजनेचा लाभ मिळण्यासाठी प्राप्त होणा-या अर्जाची छाननी करून समितीमार्फत अर्जदारांची अंतिम लाभार्थी निवड करण्यात येईल. अधिक माहितीसाठी या कार्यालयातील विकास शाखेशी तसेच दुरध्वनी क्रमांक ०७२२६-२२४२१७ वर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पारधी समाजाच्या लाभार्थ्यांना खालीलप्रमाणे योजनांचा लाभ दिला जातो.

पीठ गिरणी पुरवठा करणे, शुटिंग कॅमेरा पुरवठा करणे, शिलाई मशिन खरेदी करण्यासाठी अर्थसहाय्य देणे, पारधी समाजाच्या बचत गटांना विहीर खोदकाम करण्यासाठी क्रेन मशिन पुरवठा अर्थसहाय्य करणे, पारधी समाजाच्या बचतगटांना मंडप साहित्य खरेदी करण्यासाठी अर्थसहाय्य देणे, डी. एड. झालेल्या युवक-युवतींना शिक्षक पात्रता परिक्षेबाबत मार्गदर्शन करणे, पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण देणे, पारधी समाजाच्या लाभार्थ्यांना दुचाकी वाहने दुरूस्ती व देखभाल करण्याचे प्रशिक्षण देणे, वेल्डींग कामाचे प्रशिक्षण देवून साहित्य वाटप करणे आदी योजनांचा समावेश आहे.

## मंगळवारपासून प्रत्येक पंचायत समितीत रोजगार मेळावा

प्रतिनिधी २३ एप्रिल

**अमरावती:** जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रातर्फे युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मोहिमेंतर्गत मंगळवार, दि. २१ एप्रिलपासून दि. ८ मेपर्यंत रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. प्रत्येक पंचायत समितीमध्ये हा रोजगार मेळावा होणार आहे.

मेळाव्यामध्ये हैद्राबाद येथील गार्डियन ट्रेनिंग अकादमीचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. जिल्ह्यातील युवकांना नोकरीच्या संधी मिळवून देण्यासाठी रोजगार मेळाव्यामधून प्रयत्न करण्यात येते. कंपनीला आवश्यक असलेल्या पात्रतेच्या पदासाठी सदर कंपनीचे प्रतिनिधी लेखी परीक्षा घेऊन मुलाखती घेतील.

मेळाव्यामध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांनी कागदपत्रांसह उपस्थित राहावे. याबाबत अडचणी असल्यास जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, दुरध्वनी क्रमांक ०७२१-२५६६०६६, ८९८३४१९७९९, ८६०५६५४०२५ किंवा amravatiro®ar@gmailed.com या मेलवर संपर्क साधावा. मेळाव्यासाठी विद्यार्थ्यांनी बायोडाटा, पासपोर्ट फोटो आणि आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर यांनी केले आहे.

## जिल्ह्यातील शाळा सकाळी १० वाजेपर्यंतच भरणार

**अमरावती:** विदर्भात वाढत असलेल्या तापमानाची तीव्रता आणि भारतीय हवामान विभागाने वर्तवलेला उष्मालाटेचा इशारा लक्षात घेता जिल्हा प्रशासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी जिल्ह्यातील सर्व शाळांच्या वेळेत कपात करण्याचे आदेश जारी केले आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील शाळा आता दहा वाजेपर्यंत भरणार आहेत.

नव्या वेळापत्रकानुसार जिल्ह्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक शाळा, अंगणवाडी आणि नर्सरी आता केवळ सकाळी ७ ते १० या वेळेतच भरतील. हा आदेश २१ एप्रिल २०२६ ते ३० एप्रिल २०२६ पर्यंत लागू राहील. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी सकाळी १० नंतरच्या उर्वरित तासिका ऑनलाईन किंवा डिजिटल माध्यमातून घेण्याचे नियोजन करण्याच्या सूचना शाळांना देण्यात आल्या आहेत. हा आदेश सर्व अनुदानित, विनाअनुदानित तसेच खासगी शाळांसाठी बंधनकारक असेल.

## अण्णासाहेब पाटील महामंडळाचा १६७० कोटींचा व्याज परतावा वितरीत

प्रतिनिधी २३ एप्रिल

**अमरावती:** राज्यातील मराठा समाजातील आर्थिकदृष्ट्या मागास घटकांसाठी कार्यरत असलेल्या अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाने प्रगतीचा नवा टप्पा गाठला आहे. महामंडळाच्या व्याज परतावा योजनेच्या माध्यमातून आतापर्यंत राज्यातील १ लाख ७७ हजारांहून अधिक तरुण उद्योजकांना स्वयंरोजगाराची संधी मिळाली असून, तब्बल १ हजार ६७० कोटी रुपयांचा व्याज परतावा थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात आला आहे.

महामंडळाच्या आकडेवारीनुसार, आर्थिक वर्ष २०२५-२६ या एकाच वर्षात सर्वाधिक ५८८.६९ कोटी रुपयांचा व्याज परतावा वितरित करण्यात आला आहे. पारदर्शक प्रक्रिया आणि 'थेट लाभ हस्तांतरण'मुळे लाभार्थ्यांचा महामंडळावरील विश्वास वाढल्याचे चित्र दिसत आहे. तंत्रज्ञानाचा वापर करून लाभार्थ्यांचा प्रवास सुलभ करण्यासाठी महामंडळाने दोन महत्त्वाच्या सुविधा सुरू केल्या आहेत. यात महामंडळाच्या संकेतस्थळावर चोवीस तास उपलब्ध असलेल्या चॅटबॉटद्वारे १५ हजार ५०० पेक्षा जास्त लाभार्थ्यांनी कागदपत्रे आणि पात्रता याबाबत शंकांचे निरसन केले आहे.

तसेच ८९७६८५५९२१या व्हॉट्सॲप सेवेमध्ये आता लाभार्थ्यांना त्यांच्या अर्जाची स्थिती, पात्रता प्रमाणपत्र अपडेट्स आणि व्याज परताव्याची माहिती थेट मोबाईलवर मिळणार आहे. तसेच, नवीन शासन निर्णयांसाठी स्वतंत्र व्हॉट्सॲप चॅनेलही कार्यान्वित करण्यात आले आहे.

महामंडळाच्या वाढत्या व्यापाचा विचार करून नवी मुंबईतील पनवेल येथे अत्याधुनिक मुख्यालय उभारण्यात येणार आहे.

## शहर परेड मैदानावर महाराष्ट्र दिन कार्यक्रम साजरा होणार

**अमरावती :** महाराष्ट्र राज्याचा ६७ वा स्थापना दिवस १ मे रोजी साजरा होणार आहे.

यावर्षीचा साजरा होणारा मुख्य शासकीय कार्यक्रम पोलिस मुख्यालयाच्या शहर परेड मैदानावर होणार आहे.

यावेळी नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे यांनी केले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
गुरूवार दि २३ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## ज्ञानभारतम् प्रकल्पांतर्गत राष्ट्रीय हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेला सुरूवात

**वाशीम :** भारताला हस्तलिखितांचा फार मोठा वारसा लाभलेला आहे. पारंपारिक ज्ञान हे पिढीदर पिढी या हस्तलिखितांद्वारे प्रसारीत होत आलेले आहे. परंतू हे सर्व हस्तलिखिते जागोजागी विखुरलेल्या स्वरुपात आहेत. या हस्तलिखिताचे ज्ञानभंडार एकत्र करुन एकाच ठिकाणी उपलब्ध करुन देता यावे, या दृष्टीने केंद्र शासनाने ज्ञानभारतम् या प्रकल्पाची आखणी केली आहे. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश भारतातील मौल्यवान हस्तलिखित वारशाचे सर्वेक्षण, दस्तऐवजीकरण, संवर्धन, डिजिटायझेशन व प्रसार करणे हा आहे.भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या ज्ञानभारतम् या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत देशव्यापी हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेला १६ मार्च २०२६ पासून प्रारंभ करण्यात आला आहे.केंद्रीय अर्थसंकल्प २०२५ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या या योजनेअंतर्गत देशभरातील शैक्षणिक संस्था, संग्रहालये, ग्रंथालये, धार्मिक संस्था तसेच खाजगी संग्राहक यांच्या सहकार्याने एक कोटीहून अधिक हस्तलिखितांचा शोध व नोंदणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. तसेच भारताच्या समृद्ध ज्ञानपरंपरेशी संबंधित हस्तलिखितांचा राष्ट्रीय डिजिटल संग्रह निर्माण करून तो राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उपलब्ध करून देण्याचा केंद्र शासनाचा मानस आहे. यामध्ये हस्तलिखितांची मालकी ही संबंधीत संस्था, ग्रंथालय अथवा खाजगी संग्राहक यांचीच राहणार आहे.

# पोकरा घोटाळ्यातील दोषींवर कारवाई कधी !

## लवकरच, लोकायुक्तांकडे दाद मागण्यात येणार...

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्ह्यातील रिसोड तालुक्यात येत असलेल्या शेलुखडसे येथील पोकरा घोटाळ्याने कृषी विभागातील मोठा भ्रष्टाचार चव्हाट्यावर आला आहे. सदर गंभीर प्रकाराची तक्रार राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आली होती. त्या अनुषंगाने चौकशी अधिकारी नेमून चौकशी देखील झाली आहे. मात्र सबंधित कृषी विभागाचे अधिकारी कारवाई संदर्भात केवळ कागदी घोडे नाचवून तक्रारदार शेतकऱ्याची दिशाभूल करत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या बाबत सबळ पुरावे सादर करूनही तक्रारदार यांना चौकशी अहवालाची प्रत देण्यात आली नसल्याने हा घोटाळा दडपण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप जिल्ह्यातील शेतकरी करत आहेत. कथित भ्रष्टाचाराला वाचा फोडण्यासाठी तक्रारदार वरिष्ठ स्तरावर नव्याने तक्रार दाखल करणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. जागतिक बँक सहाय्यित नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा) योजनेत झालेल्या कथित गैरव्यवहाराची चौकशी तीन महिन्यांपूर्वी पूर्ण होऊनही दोषींवर अद्याप कारवाई न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे.







रिसोड तालुक्यातील १८ गावांमध्ये राबविण्यात आलेल्या या योजनेअंतर्गत शेततळी, ठिबक सिंचन, शेडनेट हाऊस व इतर बाबींसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर झाला होता. मात्र, अनेक ठिकाणी कामे अपूर्ण असताना किंवा न करताच पूर्ण दाखवून अनुदान उचलण्यात आल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. याची गंभीर दखल घेत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांनी चौकशी समिती नेमली होती.

'चौकशीत दोषी आढळूनही केवळ कागदी घोडे नाचवले जात आहेत. जोपर्यंत फौजदारी गुन्हे दाखल होत नाहीत, तोपर्यंत न्याय मिळणार नाही,' अशी संतप्त प्रतिक्रिया तालुक्यातील शेतकरी व्यक्त करीत आहेत.

याबाबत विभागीय कृषी सहसंचालकांशी संपर्क साधला असता, 'चौकशी अहवाल प्राप्त झाला असून, त्यावर पुढील कार्यवाहीसाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवला आहे. शासन स्तरावरून निर्देश येताच कारवाई केली जाईल,' असे त्यांनी सांगितले. कारवाईला होत असलेल्या दिरंगाईमुळे शासनाच्या हेतूबद्दलच शंका निर्माण झाली असून, शेतकऱ्यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे.

रिसोड तालुक्यातील शेलुखडसे येथील गाजलेल्या पोकरा योजनेतील गैरप्रकरणाने कृषी विभागाची लक्तरे वेशीवर टांगली आहेत. सबंधित विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या भ्रष्टाचाराची चिरफाड करणारे हे प्रकरण थेट राज्याच्या मुख्यमंत्र्यापर्यंत पोहचले आहे. मात्र आपल्या विभागाची नामुष्की झाकण्यासाठी वरिष्ठांनी केलेला प्रयत्न कारवाईच्या कसुरातून अधोरेखित होत आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात गैरप्रकार झाला असतांना आणि या गंभीर प्रकरणाचा जिल्ह्यातील सर्वच माध्यमांनी पाठपुरावा करूनही जिल्हा प्रशासन गप्प आहे. ही बाब सबंधित प्रशासनासाठी लज्जास्पद ठरत आहे. सदर प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई न झाल्यास या घोटाळ्याची एसआयटी नेमून सखोल चौकशी करण्यात यावी अशी मागणी आता जोर धरत आहे.







## थोडक्यात

### गंगोत्री वृद्धाश्रम च्या संचालिकांनी सिने अभिनेता मकरंद अनासपुरे यांना सन्मानीत



● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

रिसोड येथील सौ अर्चना सचिन गांजरे यांनी केलसुला तालुका सेनगाव येथे शासनाचे कोणतेही अनुदान नसताना स्वबळावर निराधार वृद्ध माता पिता यांना आधार देण्याचे काम गंगोत्री वृद्धाश्रम चे संचालक सचिन गांजरे व सौ अर्चना सचिन गांजरे यांनी आपली आर्थिक परिस्थिती असताना सुद्धा गंगोत्री वृद्धाश्रम सुरू ठेवून गरीब निराधार बेघर जे मुले आपल्या आई वडिलांना सांभाळत नाहीत त्या वृद्ध माता-पिता यांना गंगोत्री वृद्धाश्रम येथे मोफत प्रवेश दिला आहे.

याच कार्याची दखल घेऊन सेने अभिनेता हास्य सम्राट मकरंद अनासपुरे अमरावती चे खासदार बलवंत वानखेडे व सत्यशोधक सिनेमाचे दिग्दर्शक निलेश जी जामलकर तसेच विदर्भ केसरी वृत्तपत्राचे संपादक अमोलजी कंठाळे या सर्वांच्या उपस्थितीमध्ये सन्मानचिन्ह देऊन सन्मान केला आहे.

### सुशिक्षित बेरोजगार सेवा सोसायट्यांना शासकीय कामांचे वाटप

**प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन**

**वाशीम:** कौशल्य विकास, रोजगार व नाविन्यता विभागाच्या रोजगार व स्वयंरोजगार धोरणांतर्गत जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी सोसायट्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी विविध शासकीय कामांचे वाटप करण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत सुमारे १० लाख रुपयांपर्यंतची कामे विनानिविदा पद्धतीने देण्यात येणार असून, संबंधित सोसायट्यांकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहेत.

# शेतकऱ्याला आत्महत्येचा सल्ला, समाधान शिबिर सोडले वाऱ्यावर !

## नायब तहसीलदार कुळमेथेवर नाही होणार कारवाईचा वार, कारण सर्वच साथीदार'

● प्रभाकर नाईकवाडे @ केनवड ●

रिसोड तहसील अंतर्गत केनवड येथे आयोजित करण्यात आलेल्या समाधान शिबिरात अनेक नागरिक विविध कामांसाठी उपस्थित होते. मात्र काही ठिकाणी कर्मचारी अपुरे असल्याने आणि कामाचा वेग कमी असल्याने अनेकांना प्रतीक्षा करावी लागली. काही कामे प्रलंबित राहिल्याची तक्रार नागरिकांनी केली. कार्यक्रमादरम्यान नायब तहसीलदार कुळमेथे यांनी शिबिराला भेट दिल्यानंतर तेथून निघून गेल्याची माहिती स्थानिकांकडून देण्यात आली. शिबिर सुरू असताना जबाबदार अधिकारी उपलब्ध नसल्याने काही तक्रारी तत्काळ निकाली निघू शकल्या नाहीत.स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, त्यानंतर संबंधित अधिकारी



मेहकर–मालेगाव महामार्गावर वाळू वाहतुकीवरील कारवाईत व्यस्त होते. त्यामुळे शिबिरातील कामे प्रलंबित असताना इतर कारवायांना प्राधान्य का दिले जात आहे, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.यापूर्वी संबंधित अधिकाऱ्यांवर एका शेतकऱ्याला आत्महत्येबाबत सल्ला दिल्याचा आरोप चर्चेत आला होता. त्या पार्श्वभूमीवर सध्याच्या घटनेमुळे नागरिकांमध्ये नाराजी वाढली आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून




संबंधित अधिकाऱ्यावर योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

**'त्यांचेच दात, त्यांचेच ओठ - मग कार्यवाहीचा कोण घेईल घोट? वाशिममध्ये प्रशासकीय यंत्रणेचा भोंगळ कारभार'**

केनवड येथील समाधान शिबिरात कामकाज ढिसाळ राहिल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. काही ठिकाणी कर्मचारी अपुरे असल्याने आणि कामाचा वेग मंद असल्याने अनेकांना प्रतीक्षा करावी लागली. नायब तहसीलदार कुळमेथे शिबिरातून निघून गेल्याची माहिती स्थानिकांकडून देण्यात आली. त्यानंतर ते वाळू वाहतुकीवरील कारवाईत व्यस्त असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे शिबिरातील कामे प्रलंबित असताना इतर कारवायांना प्राधान्य दिले जात असल्याचा प्रश्न उपस्थित झाला आहे.यापूर्वीही संबंधित अधिकाऱ्यांवर आरोप चर्चेत आले होते. या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये नाराजी वाढली असून, 'तक्रारी असूनही कारवाई का होत नाही?'त्यामुळे त्यांचेच दात, त्यांचेच ओठ - मग कार्यवाहीचा कोण घेईल घोट? वाशिममध्ये प्रशासकीय यंत्रणेचा भोंगळ कारभार' असा सवाल उपस्थित केला जात आहे. या प्रकरणाची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.




## अनसिंग येथील पाणीपुरवठा योजनेतील भ्रष्टाचार !

### निकृष्ट व अपूर्ण काम, प्रशासनाच्या निष्क्रियतेच्या विरोधात सामाजीक कार्यकर्ते यश चव्हाण यांचा २७ एप्रिलपासून उपोषणाचा इशारा

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

अनसिंग येथील पाणीपुरवठा योजनेतील भ्रष्टाचार, निकृष्ट व अपूर्ण काम, प्रशासनाच्या निष्क्रियतेच्या विरोधात सामाजीक कार्यकर्ते यश चव्हाण यांनी २७ एप्रिलपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाचा इशारा दि. २२ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी यांना एका निवेदनाद्वारे दिला आहे.त्यांनी निवेदनात नमूद केले की, जल जीवन मिशन अंतर्गत राबविण्यात येणारी पाणीपुरवठा योजना ही गावातील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याच्या कायमस्वरूपी प्रश्नाचे निराकरण करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची योजना आहे. ग्रामीण भागातील प्रत्येक घरापर्यंत स्वच्छ व सुरक्षित पाणी पोहोचवणे हा या योजनेचा मुख्य उद्देश असताना, प्रत्यक्षात अनसिंग येथे ही योजना संपूर्णपणे अपयशी ठरलेली असून यामध्ये कोट्यवधी रुपयांचा उघड भ्रष्टाचार झालेला आहे, ही वस्तुस्थिती आज सर्वांसमोर स्पष्टपणे दिसून येत आहे.सदर योजना सन २०२२ मध्ये सुरू करण्यात आली असून ती सन २०२४ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र आज दिनांकापर्यंत ही योजना पूर्ण झालेली नाही. उलट अनेक ठिकाणी काम अपूर्ण अवस्थेत पडून आहे. योजनेसाठी तब्बल रुपये ८७३.७४ लक्ष इतका प्रचंड शासकीय निधी संबंधित कंत्राटदारास देण्यात आलेला असूनही प्रत्यक्षात कामाची गुणवत्ता अत्यंत निकृष्ट असून मोठ्या प्रमाणावर अपूर्णता आढळून येत आहे.

**अपेक्षा : नागरिकांचा विरंगुळा हरविला...**

## शहरातील टिळकबाग ओसाडच !

### लोकमान्य टिळकांच्या पुतळ्याची दुरावस्था

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

शहराच्या हृदयस्थानी असलेल्या टिळक बागेचे सौंदर्य मागील काही वर्षापासून लोप पावले आहे. शहरात एकमेव असलेल्या या बागेला पुनरूज्जीवन देऊन तिचे सौंदर्यीकरण करण्यासाठी गत काही वर्षापूर्वी कृती आराखडा बनविण्यात आला होता. मात्र, या आराखड्याची अंमल बजावणी न झाल्याने टिळक बाग अद्यापही ओसाड अवस्थेतच उभी आहे.

तिचे पुर्वीचे सौंदर्य कधी प्राप्त होईल का याची शहरवासियांना चिंता लागली असून शहरातील विरंगुळा हरविला असल्याची भावना नागरिक व्यक्त करित आहेत. शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेली टिळक बाग शहरातील नागरिकांसाठी आकर्षण केंद्र होते. नयनरम्य परिसर आणि सर्व गुणसंपन्न असणाऱ्या या बागेमध्ये फेरफटका मारण्यासाठी प्रत्येकाची ओढ असायची; मात्र काही वर्षापासून नगर पालिकेने केलेल्या अक्षम्य दुर्लक्षामुळे या बागेला ग्रहण लागले आहे. तिची पूर्वीची ओळख आणि तिचे सौंदर्य पूर्णपणे लोप पावले आहे. बागेतील सौंदर्यात भर टाकणारी विविध झाडे बऱ्याच प्रमाणात नष्ट झाली आहेत. लहान मुलांचे खेळण्याचे साहीत्य पाण्याचे कारंजे बसण्यासाठीचे बाकडे आदी सर्व नष्ट झाले आहेत. ज्यांच्या नावाने या बागेची निर्मिती झाली. त्या लोकमान्य टिळकांच्या पुतळ्याचीही



दुरावस्था झाली आहे. मोठ्या प्रमाणात वाढलेल्या गवत व इतर वनस्पतींमुळे धोका निर्माण होत आहे. बागेच्या आसपास राहणारे व काही बाहेरील नागरिक या जागेचा शौचालयासाठी वापर करीत आहेत. आदी प्रकारांमुळे या बागेकडे कुणीही फिरकत नसल्यामुळे येथे जुगाराचे डावही रंगत आहेत.



# वाशीम शहरातील रस्त्यांची दयनीय अवस्था; नागरिक त्रस्त, प्रशासनावर नाराजी !

## पुलाच्या समस्याकडे लक्ष देण्याची मागणी

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशिम नगरपालिका निवडणूक होऊन चार महिन्याचा कालावधी झाला असून तरीपण वाशिम शहरातील विकास अजून पर्यंत दिसत नाही. शिवाजी चौक ते पाटणी चौक रस्त्याची दयनीय अवस्था झाली असून नागरिकांना अनेक गोष्टीचा त्रास सहन करावा लागत आहे. पाटणी चौक ते शिवाजी चौक हा रस्ता लवकरात लवकर दुरुस्ती करण्यात यावा. अशी मागणी नागरिकांकडून नगरपालिकेला करण्यात येत आहे.





शहरातील रस्त्यांची अवस्था दिवसेंदिवस खालावत चालली असून अनेक ठिकाणी रस्ते अक्षरशः धूळ खात पडलेले दिसत आहेत. मुख्य मार्गांवर मोठ्या प्रमाणात खड्डे, उखडलेली डांबरीकरणे आणि उडणारी धूळ यामुळे नागरिकांचे हाल होत आहेत.

स्थानिकांच्या मते, अनेक महिन्यांपासून रस्त्यांच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष होत असून वाहनचालकांसह पादचाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः बाजारपेठ, व्यापारी संकुल परिसर आणि प्रमुख चौकांमध्ये धुळीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. त्यामुळे आरोग्यावरही परिणाम होत असल्याची तक्रार नागरिकांकडून करण्यात येत आहे. दरम्यान, वाशिममध्ये रस्त्यांच्या दुरवस्थेबाबत यापूर्वीही सामाजिक कार्यकर्त्यांनी आंदोलन छेडले होते, तसेच काही भागात खड्ड्यांमुळे अपघातांचा धोका वाढल्याचेही समोर आले आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की, 'निवडणुकीनंतर विकासाची आश्वासने दिली गेली, मात्र प्रत्यक्षात रस्त्यांची अवस्था अधिकच बिकट झाली आहे.'

प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन रस्त्यांची दुरुस्ती करावी अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## वाशिम शहरात स्ट्रीट लाईट व अंडरग्राउंड वायरिंगची दुरुस्तीची मागणी





शहरातील विविध चौका-चौकांमध्ये नवीन स्ट्रीट लाईट्स बसविण्यात यावे व विद्युत वायरिंगची अवस्था दिवसेंदिवस खराब होत चालली आहे. अनेक ठिकाणी स्ट्रीट लाईट बंद पडलेले असून काही ठिकाणी वायरिंग उघड्यावर असल्यामुळे अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. यामुळे रात्रीच्या वेळी नागरिकांना अंधारात प्रवास करावा लागत असून सुरक्षेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे.स्थानिक नागरिकांनी सांगितले की, वारंवार तक्रारी करूनही संबंधित विभागाकडून ठोस कारवाई होत नाही. विशेषतः येणाऱ्या पावसाळ्याच्या काळात उघड्या वायरिंगमुळे शॉर्टसर्किट किंवा विजेचा धक्का लागण्याचा धोका अधिक वाढू शकतो त्यामुळे प्रशासनाने तातडीने सर्व चौकांमधील स्ट्रीट लाईट्स दुरुस्त करून सुरक्षित आणि टिकाऊ उपाययोजना करावी, अशी मागणी जोर धरत आहे.नागरिकांनी पुढे सुचविले की, शहरातील प्रमुख चौकांमध्ये अंडरग्राउंड वायरिंग केल्यास भविष्यातील समस्या मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकतात. यामुळे केवळ सुरक्षाच वाढणार नाही, तर शहराच्या सौंदर्यातही भर पडेल.दरम्यान, संबंधित विभागाने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने दुरुस्ती व अंडरग्राउंड वायरिंगचे काम हाती घ्यावे, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
गुरुवार, दि. २३ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# माने चौपाटी परिसरात भीषण आग 8 दुकाने जळून लाखोंचे नुकसान







प्रतिनिधी २३ एप्रिल

**शेगांव :** शेगाव खामगाव मार्गावरील गजबजलेल्या माने चौपाटीवर बुधवारी (२२ एप्रिल)

रोजी सायंकाळी ५ वाजता सुमारास वाटीका चौकातील माने चौपाटीतील खाऊ गल्लीला भीषण आग लागून आगीत ८ दुकाने जळून खाक झाली.

आग लागल्याची माहिती मिळताच नगर परिषदेचे अग्निशमन वाहन घटनास्थळी पोहाचले व आग विझविण्याचे प्रयत्न सुरू केले व काही वेळातच आगीवर नियंत्रण मिळविले. मात्र तोपर्यंत ८ दुकाने जळून खाक झाली होती. या आगीत दुकानदारांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.प्राथमिक माहितीनुसार, एका दुकानातील फ्रिजचा कॉम्प्रेसर फुटल्यामुळे ही आग लागल्याचे सांगितले जात आहे. आगीने काही क्षणातच भीषण रूप धारण करत परिसरातील सुमारे ७ ते ८ दुकाने आपल्या विळख्यात घेतली. या आगीत दुकानदारांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असून अनेक वस्तू जळून खाक झाल्या आहेत. घटनेची माहिती मिळताच शेगाव नगरपालिकेचे अग्निशामक दल तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्याचबरोबर पोलीसही त्वरित घटनास्थळी पोहोचून परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी मदत करत होते. अग्निशामक जवानांनी अथक प्रयत्न करून आगीवर नियंत्रण मिळवले, त्यामुळे मोठी दुर्घटना टळली. सुदैवाने, या आगीत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मात्र, व्यापाऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

## शिवाजी हायस्कूलमधील ३ २ विद्यार्थिनींना सायकलचे वाटप

प्रतिनिधी २३ एप्रिल

**खामगाव :** उदयनगर येथे मानव विकास मिशन योजनेअंतर्गत येथील श्री शिवाजी हायस्कूल मधील ३२ विद्यार्थीनींना सायकलचे वाटप २२ एप्रिल रोजी करण्यात आले. श्री शिवाजी शिक्षण संस्था मेहकरचे अध्यक्ष सुदेश भाऊ लोंढे यांचे मार्गदर्शनात सन २०२४- २०२५ या वर्षासाठी सदर सायकलचे वितरण विद्यार्थिनींना करण्यात आले या निमित्त शिवाजी हायस्कूलमध्ये एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक टि.एम. गायकवाड होते तर प्रमुख अतिथी म्हणून उपमुख्याध्यापक ए.डी. नरवाडे, पर्यवेक्षक पी.ए. खराटे यांचे सह आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

याप्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थिनींना सायकलचे वितरण करण्यात आले विद्यार्थ्यांनी शालेय शिक्षण घेत असताना कठोर मेहनत घेऊन जिद्द चिकाटीने स्पर्धा परीक्षांच्या तयारी सह शिक्षण क्षेत्रातील उंच शिखर गाठावे असे आवाहन याप्रसंगी मुख्याध्यापक गायकवाड यांनी केले.

## महिला आरक्षणाचा विरोध करणाऱ्याचा निषेध

♦ शिवसेनेचे तहसीलदार यांना निवेदन



प्रतिनिधी २३ एप्रिल

**नांदुरा :** महिला आरक्षणाला विरोध करणाऱ्यां कॉंग्रेस व मित्रपक्षाचा निषेध कारणेबाबतचे निवेदन शिवसेना पक्षाचे वतीने तहसीलदार यांना २२ एप्रिल रोजी देण्यात आले.

या निवेदनात, महिला आरक्षण बाबत जो ३३ टक्केचे आरक्षण निवडणुकीमध्ये पुरषांच्या खांदयाला खांदा लाऊन काम करण्यासाठी नारी शक्ती न्याय देण्यासाठी महायुती सरकारने जो निर्णय घेतला होता. त्यांचा सर्व स्तरामध्ये विशेष महिलावर्गात फारच आनंदाचे वातारण होते. १६ एप्रिल रोजी नारी शक्तीच्या व सन्मानाचा ऐतिहासिक दिवस विरोधकांनी काळा दिवस केला. लोकशाहीच्या मंदिरात अर्थातच लोकसभा राज्यसभेमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण देणारा नारी शक्ती वंदन अधिनियम दि. १६ एप्रिल २०२६ पासुन लागू होणार होता. पण कॉंग्रेस व त्यांचे मित्र पक्षाने विधयकाला विरोध केल्याबद्दल नांदुरा तालुका शिवसेनेच्या वतीने तिव्र निषेध करण्यात येत आहे. तसेच लोकशाहीमध्ये भारतातील महिलांचे प्रतिनिधत्व सुनिश्चित करणारा हा कायदा लागू झाला असता तर १६ एप्रिलही तारीख महिलांच्या सक्षमीकरणासाठी पुढाकार एनडीए सरकारने घेतला होता व एनडीए सरकारचे नांव भारताच्या इतिहासात नेहमीच सुवर्ण अक्षरामध्ये लिहीले गेले असते. हेच विरोधकांना सहन झाले नाही. त्यासाठी त्यांनी या विधेयकाला विरोध केला. म्हणून महिला आरक्षणाला विरोध करणाऱ्यां कॉंग्रेस व मित्रपक्षाचे जाहीर निषेध करतो, असे नमूद असून हे निवेदन देते वेळी जिल्हाप्रमुख संतोषराव डिवरे, तालुका प्रमुख सुनील जुनारे, राजेश काटे, गणेश ताठे, भिका गायकवाड, रवींद्र इटखेडे यासह असंख्य शिवसैनिक उपस्थित होते.

## जामोद उपबाजारात भुईमूग खरेदीला सुरुवात!

प्रतिनिधी २३ एप्रिल

**जळगाव जामोद :** जामोद येथील कृषी उत्पन्न उपबाजार समितीत भुईमूग शेंग खरेदीला बुधवारी सुरुवात करण्यात आली. समितीचे सभापती प्रसेनजित पाटील, उपसभापती प्रशांत अवसरमोल, संचालक मंडळ, व्यापारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. पहिल्याच दिवशी सुनगाव येथील शेतकरी अमोल तायडे यांच्या भुईमूग शेंगाला हर्रासीमध्ये प्रति क्विंटल ७,१२५ रुपयांचा दर मिळाला. यावेळी सभापती पाटील यांच्या हस्ते अमोल तायडे यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. बाजार सुरु झाल्याने भुईमूग उत्पादक शेतकऱ्यांना विक्रीसाठी स्थानिक पातळीवरच सुविधा उपलब्ध होणार आहे.बाजार सुरू झाल्यामुळे शेतकऱ्यांना योग्य भाव, पारदर्शक व्यवहार आणि सोयीस्कर विक्री व्यवस्था उपलब्ध होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमास संचालक दत्ता पाटील, अरुण पारवे यांच्यासह व्यापारी व बाजार समिती कर्मचारी उपस्थित होते.याप्रसंगी पुरुषोत्तम राठी, रवींद्र गांधी, विजय राठी, संतोष कोठारी, दीपक झंवर, लक्ष्मण राऊत, विजय भगत, गजानन काकड, मंगेश मानकर, अमोल येडाखे, शेतकरी अरुण पारवे, श्रीकृष्ण लोणे, रघुनाथ हागे, गणपत ढगे, रमेश भगत तसेच बाजार समितीचे कर्मचारी हजर होते.

## पशुधनासाठी 1962 हेल्पलाईन ठरतेय जीवनवाहिनी

### वर्षभरात ६४ हजार जनावरांना मिळाले जीवदान

प्रतिनिधी २३ एप्रिल

**बुलढाणा :** पशुधन हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा असून जनावरांचे आरोग्य धोक्यात आल्यास शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होते. हे टाळण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागाने सुरू केलेली '१९६२' ही टोल फ्री हेल्पलाईन आणि मोबाईल वेटरनरी क्लिनीक यांच्यातील तांत्रिक समन्वयामुळे पशुपालकांना त्यांच्या दारापर्यंत पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध झाली आहे. या सुविधेमुळे केवळ उपचारांमधील वेळच वाचला नाही, तर दुर्गम भागातील हजारो पशुधनास वेळेत 'गोल्डन अवर' मध्ये उपचार मिळाल्याने त्यांचे प्राण वाचले आहेत. पशुसंवर्धन आयुक्तालयाने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार, गेल्या वर्षभरात या कॉल सेंटरकडे एकूण ४,०१,९९२ कॉल्स प्राप्त झाले. त्यापैकी ३,७८,०३५ पशुधनाच्या आजारविषयक समस्यांचे यशस्वीरित्या निराकरण करण्यात आले आहे. विशेषतः दुर्गम व डोंगराळ भागातील ३४,९७९ पशुपालकांनी या सुविधेचा लाभ घेतला असून त्यांच्यासाठी ही सेवा खऱ्या अर्थाने 'लाईफलाईन' ठरली आहे. अपघात, विषबाधा किंवा कठीण प्रसूती अशा आपत्कालीन स्थितीत कॉल आल्यानंतर अवघ्या दीड तासात पशुवैद्यकीय पथक प्रत्यक्ष घटनास्थळी पोहोचते. या तत्परतेमुळे ६४,७५९ पशुधनाचे प्राण वाचले असून यामध्ये २९, १३० मोठे व ३५,५६९ लहान पशुधनाचा समावेश आहे. या हेल्पलाईनद्वारे आजारी जनावरांवर तातडीचे उपचार, शस्त्रक्रिया, लसीकरण, कृत्रिम रेतन, वंध्यत्व तपासणी आणि अपघाती सेवा पुरविल्या जातात. याशिवाय चॅटबॉटद्वारे माहिती आणि शासकीय योजनांची माहितीही पशुपालकांना दिली जाते. पूर्वी किरकोळ आजारासाठीही जनावरांना दवाखान्यात नेणे जिकिरीचे व महागडे ठरत असे, परंतु आता तज्ज्ञ पशुवैद्यक स्वतः शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचत असल्याने संसर्गजन्य रोगांचा प्रादुर्भाव रोखणेही सुलभ झाले आहे. यामुळे दुग्धव्यवसाय हा एक शाश्वत व फायदेशीर व्यवसाय म्हणून आकारास येत आहे. आगामी काळात ही सेवा अधिक प्रभावी करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (ंइ) आधारित प्राथमिक सल्ला आणि व्हॉट्सॲप चॅटबॉट यांसारख्या अद्ययावत तंत्रज्ञानाचा समावेश करण्याचे नियोजन असल्याचे पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी स्पष्ट केले आहे. या प्रगत प्रणालीमुळे प्रत्येक कॉलचे अचूक ट्रॅकिंग करणे आणि दुर्गम भागातील गरजांचे विश्लेषण करून अधिक नियोजनबद्धकाम करणे शक्य होणार आहे.

डिजिटल क्रांतीची ही जोड पशुधनाची हानी कमी करून ग्रामीण अर्थव्यवस्थेला अधिक बळकटी देणारी ठरेल.

## खामगाव शहरातील जुनी अतिक्रमणे नियमित होणार!

प्रतिनिधी २३ एप्रिल

**खामगाव :** शहरातील शासकीय जमिनीवर १ जानेवारी २०११ पूर्वी झालेली आणि आजही अस्तित्वात असलेली निवासी अतिक्रमणे नियमित करण्यासाठी शासनाने पुढाकार घेतला असून, खामगाव नगरपरिषद हद्दीतील पात्र नागरिकांनी या योजनेचा लाभघेण्यासाठी २९ मे २०२६ ही अंतिम मुदत लक्षात ठेवून अर्ज सादर करावेत, असे आवाहन केले आहे. संबंधितांनी अर्ज विहित नमुन्यात भरून आवश्यक कागदपत्रांसह नगरपरिषद खामगाव च्या बांधकाम

विभागात कार्यालयीन वेळेत जमा करणे बंधनकारक असून, पुरावा म्हणून वीज बिल, जुनी घरपट्टी पावती किंवा १ जानेवारी २०११ पूर्वीचा कोणताही शासकीय दस्तऐवज ग्राह्य धरला जाणार आहे. अधिकाऱ्यांच्या सादर करण्यात येणारी कागदपत्रे स्पष्ट, अचूक आणि पडताळणीयोग्य असावीत, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. दरम्यान, प्राप्त अर्जाची छाननी उपविभागीय अध्यक्षतेखालील समितीकडून केली जाणार आहे. समितीच्या अहवालाच्या आधारे पात्र नागरिकांच्या अतिक्रमणांबाबत अंतिम निर्णय घेतला जाईल, नागरिकांनी अर्ज करावेत, असे आवाहन मुख्याधिकारी डॉ. प्रशांत शेळके यांनी नागरिकांना केले आहे.

## महाराष्ट्रातील साधु संत बाबत आक्षेपार्ह विधान करणाऱ्या विकास लवांडे विरूध्द कारवाईची मागणी

प्रतिनिधी २३ एप्रिल

**नांदुरा :** महाराष्ट्रातील तमाम वारकरी सांप्रदायांचे श्रध्दास्थान गुरुवर्य भास्करगीरी महाराज श्रीक्षेत्र देवगड व गुरुवर्य संजय महाराज पाचपोर व इतर संत मंडळी यांच्या बद्दल वारकरी संप्रदायात घुसखोरी करणारे असे अवमानजनक शब्द वापरून भारतातील व महाराष्ट्रातील २० नामवंत महाराजांची यादी राष्ट्रवादी शरद पवार गटाचा तथाकथीत प्रवक्ता विकास लवांडे याने सोशल मीडियावर सादर केलेली बाब हि अतिशय निंदनिय व आक्षेपार्थ आहे.

वारकरी संप्रदाय व सनातन वैदिक हिंदुधर्मियामध्ये व वारकरी संप्रदायात प्रचंड संताप निर्माण होत आहे. विकास लवांडे हा सोशल मिडीयावर आक्षेपार्ह



विधाने करीत आहे. विकास लवांडे यांने सर्व संताच्या पायावर डोके ठेवून माफी मागावी अन्यथा अशाप्रकारची चुकीची विधाने केल्याबद्दल अटक करुन त्याच्यावर योग्य ती कार्यवाही करावी. अशी मागणी विध्यमान दंडाधिकारी तथा तहसीलदार नांदुरा यांना एका निवेदना द्वारे करण्यात आली आहे. ज्यांच्या घरात साधुसंतांची निंदा केली जाते ते घर नसून यमपुरी नरक आहे. अशा लोकांच्या पापाला

कशाचीच उपमा नाही. अमर्याद पाप त्यांच्या संगतीने इतर लोकांनाही त्रास होतो. ज्याला संतांची निंदा आवडते तो माणूस जिवंत असतानाच नरकात राहतो. तुकाराम महाराज म्हणतात अशा दुष्ट माणसांना यमदूत सहजपणे शिक्षा करतात. सदर निवेदनावर राम महाराज झांबरे, हरीचंद्र वासुदेव साबे, सुधाकर साबे यांचेसह अनेक वारकरी बांधवांचे शिष्टमंडळाचे प्रतिनिधींनी सोमवार २० एप्रिल २०२६ रोजी स्वाक्षरीसह लेखी निवेदन असंतोष सादर करून पसरविणाऱ्या विरूध्द कारवाई करण्याची मागणी केलेली आहे.

## दिशा समितीची बैठक ; केंद्रीय योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा

♦ सिंचन प्रकल्पही प्राधान्याने पूर्ण करण्याच्या सूचना

प्रतिनिधी २३ एप्रिल

**बुलढाणा :** जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या केंद्र शासनाच्या विविध योजनांच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण (दिशा) समितीची बैठक मंगळवारी जिल्हा नियोजन समिती सभागृहात पार पडली. बैठकीस केंद्रीय आयुष व कुटुंब कल्याण राज्यमंत्री तथा समितीचे अध्यक्ष

प्रतापराव जाधव, जिल्हाधिकारी डॉ. प्रविण कुमार देवरे, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीत सिंचन प्रकल्प, भूसंपादन व पुनर्वसन प्रक्रियेचा सविस्तर आढावा घेण्यात आला. प्रकल्पबाधितांच्या तक्रारींचे निराकरण, पुनर्वसित गावांमध्ये रस्ते, पाणी व वीज यांसारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे, तसेच जिगाव सिंचन प्रकल्पातील पाण्याचे प्रभावी नियोजन करण्यावर भर देण्यात आला.प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत २०२४-२५ या वर्षात जिल्ह्यातील सुमारे ५ लाख ८८ हजार शेतकऱ्यांना ७१२ कोटी रुपयांची नुकसानभरपाई वितरित झाल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. प्रलंबित ई-केवायसी पूर्ण करून पात्र शेतकऱ्यांपर्यंत लाभ पोहोचविण्याच्या सूचना देण्यात आल्या. गावनिहाय भेटींद्वारे योजनांची माहिती देण्यावरही भर देण्यात आला.मुख्यमंत्री सौर वाहिनी, प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना, जलजीवन मिशन, मनरेगा, स्वच्छ भारत मिशन, प्रधानमंत्री जनआरोग्य योजना आदी विविध योजनांचा आढावा घेताना अंमलबजावणीतील त्रुटी दूर करण्याचे निर्देश देण्यात आले. सीएससी व आधार केंद्रांवरील तक्रारींची दखल घेत तपासणी व आवश्यक कारवाई करण्याबाबतही सूचित करण्यात आले.

## 16 आरोग्य केंद्रे, 51 उपकेंद्रांची घोषणा ; तरीही रुग्णसेवेतील अडचणी कायम !

♦ केंद्रीय राज्यमंत्र्यांकडून जिल्हा आरोग्य व्यवस्थेचा आढावा; मनुष्यबळ व सुविधांवर बैठकीत भर!

प्रतिनिधी २३ एप्रिल

**बुलढाणा :** जिल्ह्यात वाढती लोकसंख्या आणि त्यानुसार अपुऱ्या ठरत चाललेल्या आरोग्य सुविधांच्या पार्श्वभूमीवर १६ नवीन प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि ५१ उपकेंद्रे सुरू करण्याची घोषणा केंद्रीय आयुष व आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केली; मात्र या घोषणेमुळे ताणलेल्या आरोग्य व्यवस्थेला प्रत्यक्षात किती दिलासा मिळणार, याबाबत प्रश्नचिन्ह कायम आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात बुधवारी (दि. २२) पार पडलेल्या आढावा बैठकीत आरोग्य विभागाच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. सध्या जिल्ह्यात १ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, १ जिल्हा रुग्णालय, १ स्त्री रुग्णालय, १४ ग्रामीण रुग्णालये, ५७प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि २८२ उपकेंद्रे कार्यरत आहेत. कागदोपत्री ही यंत्रणा सक्षम दिसत असली, तरी प्रत्यक्षात रुग्णालयांतील रांगा, डॉक्टरांची अपुरी उपलब्धता आणि तपासण्यांसाठी होणारा विलंब, यामुळे नागरिकांना खासगी

उपचारांकडे वळावे लागत असल्याचे वास्तव समोर येत आहे. रुग्णसंख्या वाढत असताना सुविधांची वाढ त्याच प्रमाणात झालेली नाही. परिणामी जिल्हा रुग्णालयापासून ग्रामीण आरोग्य केंद्रांपर्यंत उपचार यंत्रणेवर ताण वाढला आहे. या पार्श्वभूमीवर बैठकीत मनुष्यबळाच्या प्रश्नावर विशेष भर देण्यात आला. डॉक्टरांची नियमित उपस्थिती सुनिश्चित करण्यासाठी बायोमेट्रिक हजेरी सक्तीची करण्याचे, रिक्त पदे तातडीने भरण्याचे तसेच प्रत्येक तालुक्यात डायलिसिस केंद्र आणि रक्तपेढी उभारण्याचे निर्देश देण्यात आले. कोविड

### बैठकीतील प्रमुख निर्देश

- ♦ डॉक्टरांसाठी बायोमेट्रिक हजेरी सक्तीची, रिक्त पदे तातडीने भरणे, प्रत्येक तालुक्यात डायलेसिस केंद्र, रक्तपेढी, अतिरिक्त वैद्यकीय साधनांचे पुनर्वितरण, योजनांचा लाभतळागाळापर्यंत पोहोचवणे

काळातील निष्क्रिय साधनसामग्री कार्यान्वित करण्यावरही भर देण्यात आला. आरोग्य सेवा हे जनसेवेचे सर्वात महत्त्वाचे साधन आहे. तिचा लाभशेवटच्या घटकापर्यंत पोहोचला पाहिजे, असे प्रतापराव जाधव यांनी नमूद केले; मात्र केवळ नव्या केंद्रांच्या घोषणांनी समस्या सुटणार नसल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. आरोग्य सेवेत सातत्य आणि प्रशिक्षित मनुष्यबळाची उपलब्धता आवश्यक असल्याचेही ते स्पष्ट करतात.

## हुंड्यासाठी विवाहितेचा छळ, चारित्र्यावर संशय

♦ अमरावती येथील पतीसह सासरच्या चौघांविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी २३ एप्रिल

**शेगाव :** हुंड्यात चारचाकी वाहनासाठी १० लाख रुपयांची मागणी करत विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ केल्याप्रकरणी पती, सासू-सासरे व नणंद अशा चौघांविरुद्ध शेगाव शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चारित्र्यावर संशय घेऊन मारहाण करणे व जीवे मारण्याची धमकी दिल्याचाही आरोप तक्रारीत नमूद आहे. कोमल अजिंक्य गवळी (२९, रा. विश्वशांती नगर, अमरावती; ह. मु, रोकडीया नगर, शेगाव) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, १४ ते २२ ऑगस्ट २०२५ या कालावधीत अमरावती येथील सासरी हा प्रकार घडला. या प्रकरणी आरोपी म्हणून पती अजिंक्य अनिल गवळी (३२), सासरे अनिल दत्तात्रय गवळी (६१), सासू किरण अनिल गवळी (५६, सर्व रा. विश्वशांती नगर, अमरावती) तसेच नणंद प्रगती भूषण गोरे (२८, रा. एम्स क्वार्टर, नागपूर) गांच्यातिऊट गन्ता नॉटतिगान भालाआहे. तक्रारीनुसार, पती अजिंक्य गवळी हा नेहमी चारित्र्यावर संशय घेऊन व हुंड्याच्या कारणावरून फिर्यादीस मारहाण करत होता. सासू-सासरे यांनीही 'मुलगा सरकारी नोकरीत असून, तुझ्यापेक्षा चांगली मुलगी मिळाली असती. १० लाख रुपये आणले तरच सुखाने नांदवू, अन्यथा फारकत देऊ,' असा दबाव टाकल्याचा आरोप आहे. यासोबतच आरोपींनी करून संगनमत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली व १० लाख रुपये न आणल्यास जीवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. या संदर्भात फिर्यादीने बुलढाणा जिल्हा पोलिस अधीक्षकांकडे तक्रार केली होती. त्यांच्या १० एप्रिल २०२६ च्या आदेशानुसार २२ एप्रिल रोजी शेगाव शहर पोलिस ठाण्यात भा.न्या.सं. कलम ८५, ११५(२), ३५१(२), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस अंगलटार नीलेश गालो करत आहेत.

## खामगाव शहरासह परिसरात विजेचा लपंडाव; नागरिक त्रस्त!

प्रतिनिधी २३ एप्रिल

**खामगाव :** शहरासह परिसरात मागील काही दिवसांपासून विजेचा लपंडाव सुरू असून, त्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. अनेक भागांत दिवसातून वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. विशेषतः वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर या समस्येची तीव्रता अधिक जाणवत आहे. खामगाव शहरात देखभाल व दुरुस्तीच्या कारणास्तव तासन्तास वीजपुरवठा खंडित केला जात असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून केल्या जात आहेत. यामुळे नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. घरगुती कामकाज, लहान व्यवसाय तसेच व्यापाऱ्यांनाही याचा फटका बसत आहे. ग्रामीण भागात परिस्थिती अधिकच गंभीर असल्याचे चित्र आहे. वारंवार वीजपुरवठा खंडित होणे, तसेच बिघाड झाल्यास तासनतास दुरुस्ती न होणे, यामुळे शेतकरी व ग्रामस्थ त्रस्त झाले आहेत. शेतीसाठी आवश्यक असलेला वीजपुरवठा अनियमित झाल्याने पिकांवरही परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, संबंधित वीज वितरण यंत्रणेने परिस्थितीकडे गांभीर्याने लक्ष देऊन वीजपुरवठा सुरळीत करावा, तसेच नियोजित दुरुस्तीबाबत आगाऊ सूचना द्याव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

गुरुवार, दि. २३ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


# शहरातील विविध भागात बोअर बंद







प्रतिनिधी २३ एप्रिल

**अकोला :** शहरातील विविध भागात बोअर बंद पडलेले दिसतात. एकीकडे महानच्या प्रकल्पातील पाणी पुरवठा दररोज कमी होत आहे. तसेच तातडीच्या दुरूस्ती योजनेकडे दुर्लक्ष दिसते. शहरात शिवसेना वसाहत, पोळा चौक, खोलेश्वर, राजपूतपुरा भागात बोअर बंद पडले आहे. शहरात सध्या ४३, ४४ अंश सेल्सिअस

## ♦ तातडीच्या दुरूस्तीकडे दुर्लक्ष

तापमान आहे. तसेच पाण्याची मागणी वाढली आहे. अशा स्थितीत पाण्याचे स्त्रोत कार्यरत असणे आवश्यक आहे परंतु या बाबतीत महापालिका जलप्रदाय विभागाचे दुर्लक्ष दिसते. विविध भागात बोअर सुरू राहिले तर नागरिकांना किमान वापरण्यासाठी पाणी उपयुक्त पडू शकते. याकडे लक्ष दिले जावे अशी मागणी आहे.

# अकोला महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाची दयनीय अवस्था

## ♦ पाचपैकी फक्त दोनच गाड्या कार्यरत, तीन गाड्या बंद



प्रतिनिधी २३ एप्रिल

**अकोला :** शहरातील अग्निशमन व्यवस्थेची गंभीर स्थिती समोर आली आहे. अकोला महानगरपालिकेकडे अग्निशमन दलाच्या एकूण पाच गाड्या असताना त्यापैकी केवळ दोनच गाड्या सध्या कार्यरत आहेत, तर उर्वरित तीन गाड्या बंद अवस्थेत पडून आहेत. त्यामुळे शहरात मोठी आग लागल्यास आपत्कालीन परिस्थिती हाताळणे कठीण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने ही बाब अत्यंत चिंताजनक मानली जात आहे.

अकोला महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागात मोठी निष्काळजीपणा समोर येत आहे. शहराच्या सुरक्षेसाठी महत्त्वाच्या असलेल्या अग्निशमन दलाच्या पाच गाड्यांपैकी केवळ दोन गाड्या सध्या सुरू स्थितीत आहेत. उर्वरित तीन गाड्या विविध कारणांमुळे बंद पडल्या असून त्यांची दुरुस्ती अद्याप करण्यात आलेली नाही.यामुळे शहरात एखादी मोठी आग लागल्यास परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी आवश्यक साधनसामग्री अपुरी पडू शकते. अग्निशमन यंत्रणेतील या कमतरतेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.स्थानिक नागरिकांकडून प्रशासनाकडे वारंवार तक्रारी केल्या जात असल्या तरी अद्याप ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. संबंधित अधिकाऱ्यांनी तात्काळ लक्ष घालून बंद पडलेल्या गाड्या सुरू कराव्यात एकूणच, अकोल्यातील अग्निशमन व्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनला असून प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देणे गरजेचे आहे.

# अकोल्यात सरकारी धान्य दुकानांमध्ये नागरिकांची गैरसोय

## ♦ कडक उन्हात तासनतास उभे राहून घ्यावे लागते धान्य

प्रतिनिधी २३ एप्रिल

**अकोला :** शहरात सरकारी धान्य दुकानांमध्ये नागरिकांची मोठी गैरसोय होत असल्याचे चित्र समोर आले आहे. कडक उन्हात तासनतास रांगेत उभे राहून नागरिकांना धान्य घ्यावे लागत आहे. विशेष म्हणजे, हेच धान्य सायंकाळच्या वेळेतही वितरित करता येऊ शकते, मात्र तशी कोणतीही व्यवस्था सध्या दिसत नाही.

अकोला शहरातील विविध शासकीय रेशन दुकानांवर नागरिकांना कडक उन्हात उभे राहून धान्य घ्यावे लागत आहे. दुपारच्या उन्हामुळे लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना विशेष त्रास सहन करावा लागत आहे. अनेक ठिकाणी सावलीची किंवा बसण्याचीही योग्य व्यवस्था नसल्याने परिस्थिती अधिकच बिकट होत आहे.स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे मागणी केली आहे की, धान्य वितरणाची वेळ बदलून सायंकाळच्या सत्रातही वितरण करावे, जेणेकरून उन्हाचा त्रास टाळता येईल. मात्र, अद्याप यावर कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. दरम्यान, प्रशासनाने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन नागरिकांना दिलासा देण्यासाठी योग्य उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# बाळापूर मतदारसंघात 200 किमी पाणंद रस्त्यांचा आराखडा

प्रतिनिधी २३ एप्रिल

**अकोला :** बाळापूर विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांना शेतापर्यंत सर्व हंगामी रस्त्यांची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी 'मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना २०२६' अंतर्गत सुमारे २०० किलोमीटर पाणंद रस्त्यांच्या निर्मितीचा आराखडा तयार करण्यात आला असून, चालू वित्तीय वर्षात यापैकी २५ किलोमीटर रस्त्यांच्या कामांना प्राधान्य देण्याचे निर्देश उद्धवसेनेचे उपनेते तथा आमदार नितीन देशमुख यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. या संदर्भात २२ एप्रिल रोजी स्थानिक शासकीय विश्रामगृह येथ आढावा बैठक पार पडली.

बैठकीदरम्यान मतदार संघातील शेतकऱ्यांना शेतापर्यंत सर्वहंगामी रस्त्यांची सुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी टप्पाटप्प्याने पाणंद रस्त्यांचे नियोजन करण्याबाबत आमदार देशमुख यांनी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. तसेच या रस्त्यांमुळे शेतीमालाची वाहतूक सुलभहोऊन शेतकऱ्यांचा वेळ व खर्च वाचणार असल्याचे त्यांनी नमूद केले. या बैठकीस उद्धवसेनेचे उपजिल्हाप्रमुख योगेश्वर वानखडे, शिवसेना नेते बबलू उर्फ अनिरुद्ध देशमुख, उपविभागीय अधिकारी संतोष येवलीकर, तहसीलदार वैभव फरताळे, प्रभारी तहसीलदार दीपक केंद्रे, मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे कार्यकारी अभियंता उमेश वानखडे, उपअभियंता संजय राठोड उपस्थित होते. पाणंद रस्ते योजनेच्या विद्यमान तरतुदीनुसार एका वित्तीय वर्षात जास्तीत जास्त २५ किलोमीटर अंतराचे पाणंद रस्ते मंजूर करण्याची मर्यादा असल्याने चालू वर्षात प्रथम टप्प्यात २५ किलोमीटर रस्त्यांच्या कामांना प्राधान्याने प्रस्तावित करण्याच्या सूचना आमदार देशमुख यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. उर्वरित रस्त्यांसाठी पुढील टप्प्यांमध्ये प्रस्ताव सादर करून कामे मार्गी लावण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली.

# अंधश्रद्धेच्या सावटाखाली चिमुरड्यांचे आयुष्य

## ♦ मूर्तिजापूरच्या निंबा गावातील धक्कादायक प्रकार

प्रतिनिधी २३ एप्रिल

**अकोला :** जिल्ह्यातील मूर्तिजापूर तालुक्यातील निंबा गावातून एक संवेदनशिल प्रकार समोर आला आहेष्ठ जिथे श्रद्धेच्या नावाखाली सुरू असलेल्या कृत्यांनी अनेक गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. स्थानिक नागरिक आता याकडे अंधश्रद्धा आणि शोषणाच्या नजरेतून पाहत आहेत.

निंबा गावातून एक व्हिडिओ समोर आला आहे, ज्यामध्ये एका लहान मुलाला तोंडाने कपडे पकडून कशाप्रकारे झुलवले जात आहे, हे दिसत आहे. हे प्रकरण मधू महाराज आणि चेतन महाराज यांच्याशी संबंधित असल्याचे सांगितले जात आहे. हा विषय केवळ एका गावापुरता मर्यादित नसून, त्या मानसिकतेवर प्रकाश टाकतो जिथे श्रद्धा आणि अंधश्रद्धा यातील पुसट होत चाललेली रेषा दिसून येते. आजकाल अनेक ठिकाणी धर्म आणि विश्वासाच्या नावाखाली असे कथित चमत्कार, उपाय आणि प्रवचनं केली जात आहेत, ज्याचा थेट परिणाम भोळ्याभाबड्या जनतेवर होतोय. गावातील काही लोकांचे म्हणणे आहे की, अशा कृत्यांमुळे केवळ लोकांच्या भावनांचा फायदा घेतला जात नाहीये, तर अनेकदा आर्थिक शोषण आणि मानसिक दबावासारख्या परिस्थितीही समोर येत आहेत.कोणाची श्रद्धा ही त्याची कमजोरी बनून त्याचे शोषण होणार नाही. कारण श्रद्धा जर ताकद असेल, तर अंधश्रद्धा तीच ताकद हिरावून घेऊ शकते. आणि जेव्हा प्रश्न महिलांच्या सन्मानाचा आणि मुलांच्या भविष्याचा येतो, तेव्हा शांत राहून चालणार नाही तर सामंजस्य आणि धैर्याने पाऊल उचलणे गरजेचे आहे.

# न्यू भीम नगरमध्ये परिस्थिती बिकट..

## ♦ ना नाल्यांची स्वच्छता, ना रस्ते नीट

प्रतिनिधी २३ एप्रिल

**अकोला :** येथील प्रभाग १३ मधील न्यू भीम नगर भागातून विदारक परिस्थिती समोर आली आहेष्ठ

जिथे मूलभूत सुविधांच्या अभावामुळे नागरिक त्रस्त आहेत. विशेष म्हणजे, या भागात चार-चार नगरसेवक असूनही कोणीही आपली जबाबदारी पार पाडत नसल्याचा आरोप स्थानिक रहिवाशांनी केला आहे.

न्यू भीम नगर परिसरात सध्या समस्यांचा डोंगर उभा राहिला आहे. येथील रहिवाशांना दैनंदिन मूलभूत सुविधांसाठीही मोठा संघर्ष करावा लागत आहे. परिसरातील नाल्यांची एक तर स्वच्छता केली जात नाही. त्या तुंबून सर्वत्र घाण पसरत आहे. त्यामुळे परिसरात



दुर्गंधी सुटली असून डासांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे.रस्त्यांची अवस्था देखील अत्यंत दयनीय आहे. उखडलेल्या रस्त्यांवरून चालणे नागरिकांसाठी धोक्याचे बनले आहे. येथे दररोज अपघाताची भीती कायम असते. इतकेच नाही तर, परिसरातील हातपंप देखील अनेक दिवसांपासून नादुरुस्त आहेत. ज्यामुळे लोकांना पाण्यासाठी वणवण फिरावे लागत आहे. स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की, नियमित साफसफाईची कोणतीही व्यवस्था येथे नाही. आणि वारंवार तक्रारी करूनही परिस्थिती 'जैसे थे' आहे. सर्वात मोठा प्रश्न हा आहे की जेव्हा या क्षेत्रात चार-चार नगरसेवक आहेतष्ठतेव्हा नक्की जबाबदारी कोणाची? जनतेने यांना केवळ निवडणुकांपुरतेच निवडून दिले आहे का? आणि विकास केवळ कागदावरच मर्यादित राहिला आहे का? जर लवकरच या समस्यांचे निराकरण झाले नाही तर नागरिकांनी तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. ही प्रशासनची निष्काळजी भविष्यात मोठ्या आजारांना आणि संकटांना निमंत्रण देऊ शकते.

# शेलूबाजार येथे साईश्रद्धा मंदिरात लवकरच साई चरण स्पर्श पादुका दर्शन सोहळा



प्रतिनिधी २३ एप्रिल

**मंगरूळपीर :** शिर्डी येथील श्री साईबाबा यांच्या चरण स्पर्श पवित्र पादुका लवकरच शेलूबाजार येथील साईश्रद्धा संस्थानात दर्शनासाठी शिर्डी वरून येणार आहे.

साईबाबा यांच्या चरण पादुका आमंत्रण देण्यासाठी साई श्रद्धा संसधान अध्यक्ष मोहन राऊत अतुल कुलकर्णी मुखमाले सर जलील खा शिर्डी येथे जाऊन निमंत्रण दिले त्यांनी आमंत्रण स्वीकारले असून ते लवकरच तारीख देणार आहे

साईभक्त सहपरिवार पवित्र पादुका दर्शनाचा लाभ घ्यवा अशे आव्हान साईश्रद्धा संसधान शेलूबाजार यांनी केले आहे दिवसभर दर्शन सोहळा गावात भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे.

# अकोलेकरांना मोठा दिलासा, निलेश देव यांच्या पुढाकाराला यश

## ♦ ऑनलाईन मालमत्ता कर भरण्यावर १०टक्के सवलत!

प्रतिनिधी २३ एप्रिल

**अकोला :** अकोला महानगरपालिकेच्या २०२६-२०२७ या आर्थिक वर्षासाठी नागरिकांना दिलासा देणारा अत्यंत सकारात्मक व लोकाभिमुख निर्णय जाहीर करण्यात आला असून, ऑनलाईन पद्धतीने आगाऊ मालमत्ता कर भरणाऱ्या करदात्यांना सामान्य करावर तब्बल १०ऌ सवलत देण्यात येणार आहे. हा निर्णय गटनेता, वंचित बहुजन आघाडी तथा नगरसेवक निलेश देव यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे फलित मानला जात आहे.

दिनांक २० मार्च रोजी निलेश देव यांनी मा. आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्याकडे लेखी निवेदन सादर करून, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदीनुसार एप्रिल, मे व जून या कालावधीत आगाऊ मालमत्ता कर भरणाऱ्या करदात्यांना सवलत जाहीर करण्याची ठोस मागणी केली होती. नागरिकांना आर्थिक दिलासा मिळावा, कर भरण्याची प्रक्रिया सुलभ व्हावी आणि महानगरपालिकेचा महसूल वाढावा या उद्देशाने ही मागणी करण्यात आली होती. या मागणीची सकारात्मक दखल घेत महानगरपालिकेने त्वरित निर्णय घेत ऑनलाईन कर भरणाऱ्यांना १०ऌ सवलत जाहीर केली आहे. या निर्णयामुळे अकोलेकर नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# अशोकवाटीका चौकातील उपवनसंरक्षक कार्यालयाची आवारभिंत बांधकाम नियमबाह्य?

प्रतिनिधी २३ एप्रिल

**अकोला :** अशोक वाटीका समोरील चौकातील वनउपसंरक्षक कार्यालयाची आवारभिंत बांधकाम सुरु असून आवार भिंतीमुळे अशोकवाटीका चौकातील वाहतूकीची कोंडी होत आहे. या विषयाकडे दखल संस्थेने लक्ष वेधले.

सदर वॉल कंपाऊंड ही जून्या मूळ जागेवर अंदाजे बांधण्यात येत असल्याची तक्रार आहे. तक्रारीत उल्लेख केला आहे की आपल्या कार्यालयाची आवारभिंत ही बाहेर रस्त्यावर आलेली आहे या आवारभिंतीचे चे बांधकाम हे त्वरित थांबविण्यात यावे या आशियाचे निवेदन दाखल संस्थेने आज जिल्हाधिकारी यांना दिले.

उपवनसरक्षक कार्यालयाच्या मनमानी कारभारामुळे अनेक नियमबाह्य कामे होऊ लागलेली आहेत. हायवे लगतच्या भिंतीचे बांधकाम करताना हायवे डिपार्टमेंटची एनओसी घेणे आवश्यक आहे परंतु असल्या प्रकारची कुठलीही आवश्यक असलेल्या विभागाची परवानगी न घेता मनमानी पद्धतीने निविदा मंजूर करून कामाचा आदेश जारी करण्यात आलेला आहे. रस्त्याच्या रुंदीकरणाकरिता किंवा रस्त्याच्या बांधकामा करता अडचण ठरलेल्या रस्त्या लागत असलेली लोकांची घरे पाडली जातात आणि इथे कोणतीही कार्यवाही न करता किंवा सूचना न देता सरळ बांधकाम सुरू करण्यात



आलेले आहे. अशोक वाटिका चौकात वाहतूक कोंडी होत असते. वनविभागाच्या भिंतीमुळे अशोक वाटिकेकडून मूर्तिजापुर कडे जाणारा रस्ता हा या भिंतीमुळे अरुंद झालेला आहे. ही भिंत तयार झाल्यास कधीच या ठिकाणी रस्त्याचे रुंदीकरण होऊ शकणार नाही. उपवनसंरक्षक अकोला यांच्या मनमानी कारभारामुळे वन खात्याचे विविध ठिकाणी असे नुकसान होत आहे. वन उपसंरक्षक कोर्टाचे आदेश ला सुद्धा मानत नसून त्यांनी कोर्टाच्या आदेशाला धुडकावून लावले असल्याची चर्चा त्यांच्या कार्यालयात सुरू आहे.

भूमिअभिलेख विभाग, हायवे विभाग, शहरवाहतूक विभाग, प्रादेशिक परिवहन विभाग आणि महानगरपालिका नगररचना विभागाचे सक्षम अधिकारी यांच्या उपस्थितीत नियमीत पणे आपल्या जागेचे मोजमाप करुन निशाणी कायम करुन सदर काम पूर्ववत सुरु करावे जेणे करुन भविष्यात या ठिकाणी वाहतूकीची कोंडी होणार नाही . याची संबंधित विभागाने तात्काळ दखल घेऊ सदरचे बांधकाम मोजमाप होईपर्यंत थांबवावे ही दखल संस्थे तर्फे जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आलेले आहे. दखलच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन चर्चा केली आणि उपवनसंरक्षक यांच्या कारभाराबाबत तक्रार केलेली आहे. तसेच या विषयांवर चौकशी करण्याचे व कारवाई करण्याचे आदेश देण्यात यावे असे मत व्यक्त केले. यावेळी दखलचे संस्थापक अध्यक्ष प्रदीप गुरुखुद्दे, डॉ. चंद्रकांत पनपालिया, जयप्रकाश मुरूमकार पाटील, विदर्भ ग्रुपचे संचालक ठाकूरदास चौधरी, डॉ. छाया देशमुख, अनिता कवडे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे माजी कार्यकारी अभियंता महेश देशमुख, एमआयडीसीचे माजी अभियंता संजय देशमुख, राजेश डोंगरकर, बिपिन सुरतकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे माजी अधिकारी राजकुमार होतवाणी, संदीप काळे, माजी आरोग्य अधिकारी दिलीप जी हांडे आधी पदाधिकारी व कार्यकर्ते जिल्हाधिकारी यांना निवेदन देताना उपस्थित होते.

# जिल्ह्यात एचपीव्ही लसीकरण जनजागृती मोहिम

प्रतिनिधी २३ एप्रिल

**अकोला :** जिल्हा परिषद अंतर्गत आरोग्य विभागाच्या वतीने विविध आरोग्यविषयक योजनांची व्यापक जनजागृती मोहीम सध्या जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणाऱ्या या मोहिमेमुळे ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण होत आहे.

या मोहिमेत एचपीव्ही (ह्युमन पॅपिलोमा व्हायरस) लसीकरण, टीबी मुक्त भारत अभियान (टप्पा २), वाढत्या तापमानामुळे होणाऱ्या उष्माघातापासून बचाव, 'माझे गाव आरोग्य संपन्न गाव' अभियान तसेच पॅलिएटिव्ह केअर सेवा अशा विविध उपक्रमांचा समावेश आहे. शाळा, महाविद्यालये, ग्रामसभा, गटसभा तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून विविध स्पर्धा व उपक्रम राबवून मोठ्या प्रमाणावर जनजागृती केली जात आहे. गर्भाशय मुखाच्या कर्करोगापासून संरक्षणासाठी महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या एचपीव्ही लसीकरण मोहिमेला जिल्ह्यात चांगला प्रतिसाद मिळत आहे.


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724 - 2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135